दैनिक
# लोकरक्षणाय
लोकशाहीच्या संरक्षणार्थ

www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com + 91 97023 86118

●कार्यकारी संपादक- अनिकेत घनश्याम भंकाळ ●वर्ष-०१,अंक-२६९ ●पृष्ठे-०४ ●ठाणे, गुरुवार, १४ मार्च २०२४ ●RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118 ●रु.२/-

# लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेतले 'हे' महत्त्वाचे निर्णय

**मुंबई, विशाल पाटील :**
मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली आज राज्य मंत्रिमंडळाची बैठक मंत्रालयात पार पडली. या बैठकीस उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासह मंत्रिमंडळातील सदस्य उपस्थित होते. तीन दिवसात दोन वेळा राज्य मंत्रिमंडळाच्या बैठका पार पडल्या. या बैठकीत झालेल्या ३३ निर्णयांच्या धडाक्यानंतर आजच्या बैठकीत २६ निर्णय घेण्यात आले. लोकसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर आचारसंहिता लागण्याआधी महत्त्वाच्या निर्णयांचा सपाटा लावण्यात आला. तीन दिवसात झालेल्या कॅबिनेटच्या दोन बैठकांत जवळपास एकूण ५९ निर्णय घेण्यात आले. अहमदनगर शहराचे नामांतर, पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नाव राजगड, मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावात बदल, उत्तन ते विरार सागरी सेतू मार्गास मान्यता अशा निर्णयांचा समावेश आहे.

**राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीतील महत्त्वाचे निर्णय :**

१) मराठी भाषेच्या प्रचार, प्रसारासाठी अद्ययावत मराठी भाषा धोरण जाहीर (मराठी भाषा विभाग)
२) पोलीस पाटलांच्या मानधनात भरीव वाढ. आता मिळणार महिन्याला १५ हजार (गृह विभाग)
३) अहमदनगर शहराचे नामकरण पुण्यश्लोक अहिल्यादेवी नगर करण्यास मान्यता (सामान्य प्रशासन विभाग)
४) केंद्राच्या सहाय्याने लहान शहरांमध्ये अग्निशमन सेवा बळकट करणार. राज्याच्या १५३ कोटी हिश्श्याला मान्यता (नगरविकास विभाग)
५) श्रीनगरजवळ महाराष्ट्र राज्य अतिथीगृह बांधणार. अडीच एकर भूखंड घेणार (सार्वजनिक बांधकाम विभाग)
६) कोल्हापूर, सांगली जिल्ह्यामधील पूर नियंत्रणासाठी जागतिक बँकेचे अर्थसहाय्य. ३२०० कोटींचा प्रकल्प (मदत व पुनर्वसन)
७) भांडवली गुंतवणुकीसाठी विशेष सहाय्य योजनेत ५० वर्ष मुदतीचे बिनव्याजी कर्ज (वित्त विभाग)
८) राष्ट्रीय आरोग्य विभागातील कंत्राटी कर्मचाऱ्यांना सेवेत घेणार. हजारो कर्मचाऱ्यांना लाभ (आरोग्य विभाग)
९) महानंद प्रकल्पाची स्थिती सुधारणार. नफ्यात आणणार (दुग्धविकास विभाग)
१०) मंगळवेढा उपसा सिंचन योजनेस मान्यता. ३५ गावांना लाभ होणार (जलसंपदा विभाग)
११) मूर्तिजापूर येथील वडगाव साठवण तलावाची दुरुस्ती करणार. १२५ हेक्टर जमीन सिंचित करणार (जलसंधारण विभाग)
१२) शुभमंगल सामूहिक विवाह योजनेत अनुदानामध्ये वाढ. आता २५ हजार रुपये अनुदान संस्थाना. (महिला व बालविकास)
१३) मानसेवी वैद्यकीय अध्यापकांचे मानधन वाढविले. (वैद्यकीय शिक्षण)
१४) आयटीआय मधील कंत्राटी शिल्पनिदेशकांना नियमित शासन सेवेत घेणार. (कौशल्य विकास)
१५) कृषी वाहिन्यांचे सौरऊर्जीकरण करण्यासाठी ९०२० कोटी एआयआयबी बँकेकडून घेणार. (ऊर्जा विभाग)
१६) शेतकऱ्यांना दिवसा बीच देण्यासाठी वीज वितरण प्रणालीचे सक्षमीकरण करणार, ११ हजार ५८५ कोटींच्या प्रकल्पास मान्यता (ऊर्जा विभाग)
१७) पशुसंवर्धन व दुग्धविकास विभागाचे एकत्रीकरण करून पुनर्रचना. प्रशासनात सुधारणा होणार (पशुसंवर्धन व दुग्धविकास)
१८) पुणे जिल्ह्यातील वेल्हे तालुक्याचे नाव राजगड करण्यास मान्यता (महसूल विभाग)
१९) म्हसळा तालुक्यात शासकीय युनानी महाविद्यालय व रुग्णालय सुरू करणार. युनानी उपचार प्रणालीला प्रोत्साहन (वैद्यकीय शिक्षण विभाग)
२०) आशा स्वयंसेविका मानधनात भरीव पाच हजार रुपये वाढ (सार्वजनिक आरोग्य विभाग)
२१) मुंबईतील आठ रेल्वे स्थानकांची ब्रिटिशकालीन नावे बदलणार (परिवहन विभाग)
२२) मुंबई उपनगरातील वाहतुकीचा मार्ग आणखी मोकळा होणार. उत्तन ते विरार सागरी सेतू मार्गास मान्यता (नगरविकास विभाग)
२३) मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेत २३ हजार किलोमीटर रस्ते बांधणार. या वर्षात दहा हजार किमी रस्ते (ग्रामविकास विभाग)
२४) भोगवटामूल्याची रक्कम कमी करणार, महाराष्ट्र आणि गोवा वकील परिषदेच्या अकादमीसाठी कळवा येथील शासकीय जमीन (महसूल व वन विभाग)
२५) जालना खामगाव नवीन ब्रॉडगेज रेल्वे मार्ग. २४५३ कोटी राज्याच्या हिश्यास मान्यता (परिवहन विभाग)
२६) दूध व दुग्धजन्य पदार्थांची गुणवत्ता तपासण्याचे अधिकार पशुसंवर्धन आयुक्तांना (पशुसंवर्धन व दुग्धविकास)




## डोंबिवलीत तोतया पोलिसाकडून कामगाराचे अपहरण आणि सुटका



**डोंबिवली, सचिन कदम :**
आपण पोलीस आहोत. तुमच्या जवळ वाहनाची कागदपत्रे नाहीत, अशी दमदाटी करून मंगळवारी रात्री आठ वाजता मानपाडा रस्त्यावरील आयकॉन रुग्णालय भागातून एका रद्दी पेपर संकलक कामगाराचे एका तोतया पोलिसाने अपहरण केले. त्याच्याकडे पैशाची मागणी केली. त्याला बेदम मारहाण करत त्याच्या जवळील मोबाईल काढून कामगाराला काटई नाका येथे सोडून तोतया पोलीस रिक्षेसह पळून गेला. जगदंबाप्रसाद चौरासिया (३२) असे रद्दी पेपर संकलक कामगाराचे नाव आहे. तो सोनारपाडा येथे राहतो. तक्रारदार जगदंबाप्रसाद हा मानपाडा रस्त्यावरील विठ्ठल कम्पाऊंड भागात रामकवल मौर्या यांच्याकडे घराघरांमधून रद्दी पेपर जमा करण्याचे काम करतो. पोलिसांनी सांगितले, चौरासिया आणि त्याचा एक साथीदार मंगळवारी संध्याकाळी नांदिवली टेकडी भागात एका घरांमधून विक्री केलेले रद्दी पेपर आणण्यासाठी टेम्पो घेऊन गेले होते. तेथून ते मानपाडा रस्त्याला ऑयकॉन रुग्णालय येथे रात्री आठ वाजता आले. त्यावेळी एका इसमाने त्यांना हात केला. थांबण्याचा इशारा दिल्याने चौरासिया आणि त्याचा साथीदार टेम्पोसह थांबले.

## कचऱ्याचा 'बायोमायनिंग' प्रकल्प ७० टक्के पूर्ण; महापालिकेस २५ एकर जागा होणार उपलब्ध

**पुणे, अभिजीत येरुल्लू :**
महापालिकेच्या वतीने मोशी कचरा भूमीतील बायोमायनिंग प्रकल्पाचा पहिला टप्पा पूर्णत्वास आला आहे. आठ लाख चौरस मीटर जुन्या कचऱ्याच्या बायोमायनिंगचे ७० टक्के काम पूर्ण झाले आहे. दुसऱ्या टप्प्यामध्ये अतिरिक्त १५ लाख चौरस मीटर कचऱ्याचे बायोमायनिंग केले जाणार आहे. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर मोशी कचरा भूमीतील २५ एकर जमीन मोकळी होणार आहे. त्याचा उपयोग घनकचरा व्यवस्थापन उपक्रम आणि नागरी विकास प्रकल्पांसाठी करण्यात येणार आहे. पिंपरी-चिंचवड शहरात दैनंदिन बाराशे टन कचरा निर्माण होतो. हा कचरा संकलित करून मोशी येथील कचरा भूमीत प्रक्रिया



करण्याकरिता पाठविण्यात येतो. २५ एकर जागेत २३ लाख चौरस मीटर इतका जुना टाकलेला कचरा आहे. पालिकेने जुन्या कचऱ्याचे बायोमायनिंग करण्याचे काम हाती घेतले आहे. कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने बायोमायनिंग करताना तयार होणारे आरडीएफ सिमेंट बांधकाम कंपन्यांना देण्यात येत आहे. जैव माती शेती आणि उद्यानासाठी वापरण्यात येत आहे. राडारोडा सखल भागात जमीन समपातळीत करण्यासाठी वापरण्यात येणार आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार बायोमायनिंग ही एक वैज्ञानिक पद्धत आहे. या पद्धतीनुसार उत्खनन, पृथक्करण, घन कचऱ्याचा पुनर्वापर आणि कचऱ्यावर प्रक्रिया करण्यात येते. हवा आणि सूर्यप्रकाश या नैसर्गिक घटकांच्या सहाय्याने कचऱ्यावर बायोमायनिंगद्वारे प्रक्रिया करण्यात येते. कालांतराने यातील जैविक कचऱ्याचे विघटन होते. उर्वरित कचऱ्याचे वेगळ्या पद्धतीने नियोजन केले जाते. अविघटनशील कचऱ्यात धातूंचा समावेश असल्याने या कचऱ्याला मूल्य प्राप्त होते. जुन्या टाकलेल्या कचऱ्याने व्यापलेल्या जमिनीचा पुनर्वापर, बायोमायनिंग ही एक पर्यावरणपूरक पद्धत आहे. यामुळे कचऱ्यातून मिळालेले उपयुक्त घटक धातू, खतांमुळे संसाधनांचा पुनर्वापर करण्यास मदत मिळते. कचऱ्यातून उपयोगात येणारा आरडीएफ (रिफ्यूज डिराइव्ह फ्यूल) कचरा जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी किंवा बागकामासाठी खत म्हणून केला जाऊ शकतो. मृदा प्रदूषण कमी होते. यामुळे जमिनीतील पाणी स्वच्छ राहण्यास मदत होते. अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे म्हणाले, की बायोमायनिंग द्वारे पर्यावरण पुनरुज्जीवनाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकले आहे. प्रकल्पाचे काम झाल्यानंतर जुन्या ३० वषार्तील साठलेल्या कचऱ्याचे शास्त्रोक्त पद्धतीने विघटन होणार आहे.

## नवी मुंबई वाहतूक पोलिसांची विशेष मोहीम; ८ हजार ९१ विना हेल्मेट दुचाकीस्वारांवर कारवाई



**नवी मुंबई, दिगंबर जाधव :**
नवी मुंबई वाहतूक पोलिसांनी १५ दिवस राबवलेल्या विशेष मोहिमेत हजारो कारवाई करण्यात आल्या. विशेष म्हणजे यात विना हेल्मेट, फॅन्सी गाडी क्रमांक पाटी आणि गाडीच्या काचांना लावण्यात येणाऱ्या बेकायदा काळ्या फिल्मवर कारवाई करण्यात आली. नवी मुंबईतील १६ वाहतूक बीट पोलीस ठाणेअंतर्गत २७ फेब्रुवारी ते १२ मार्च दरम्यान वाहतूक पोलिसांनी विशेष मोहीम राबवली आहे. त्यात विना हेल्मेट, फॅन्सी क्रमांक पाटी आणि काळ्या फिल्म लावणाऱ्या गाड्यांवर कारवाई करण्यात आली आहे. अति महत्वाच्या व्यक्तीच्या गाडीच्या काचांना सुरक्षा कारणास्तव काळी फिल्म लावण्यात येते. त्यामुळे गाडीत कोण आणि कुठे बसले हे बाहेरून दिसत नाही. मात्र गल्लीतील छोटे मोठे पुढारी गुंड आणि पुढारीपणा मिरवणारी मंडळीही आपल्या गाडीच्या काचांना काळी फिल्म लावतात. अशा लोकांच्या गाड्यांवर कारवाई करीत काळी फिल्म काढण्यात आल्या. अशा प्रकारे गेल्या पंधरा दिवसात २५६ गाड्यांवर कारवाई करण्यात आली आहे. दुचाकी चालवताना त्यांच्या सुरक्षेसाठी हेल्मेट अनिवार्य करण्यात आले आहे.

## अंबानी हॉस्पिटलजवळ परवडणाऱ्या दरातील सुसज्ज रुग्णालय उभे राहणार


**८५ वर्षे वयाच्या डॉक्टरचा २५ वर्षांचा लढा अखेर यशस्वी!**

**मुंबई, नितीन देवळेकर :**
अंधेरी पश्चिम येथील कोकिळाबेन अंबानी रुग्णालयाच्या शेजारील भूखंड मिळूनही प्रत्यक्ष ताब्यासाठी एका ८५ वर्षे वयाच्या डॉक्टरने २५ वर्षे दिलेल्या लढ्याला यश आले आहे. परवडणाऱ्या दरात वैद्यकीय सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने उभारल्या जाणाऱ्या कर्करोग व बहुदेशीय रुग्णालयाचा पायाभरणी समारंभ अलीकडे झाला. या रुग्णालयाचे



व्यवस्थापन टाटा ट्रस्टच्या आरोग्य विभागाअंतर्गत येणाऱ्या कार्किनोज हेल्थकेअरमार्फत सांभाळले जाणार आहे. अंधेरी पश्चिम चार बंगला येथील रुग्णालयासाठी राखीव असलेला सुमारे १२ हजार चौरस मीटर इतका भूखंड मिळावा, यासाठी शांताबाई केरकर स्मृती चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष व बालरोगतज्ज्ञ डॉ. बळवंत केरकर यांनी १९७९ मध्ये अर्ज केला. मात्र हा भूखंड उद्योग विभागातील कर्मचाऱ्यांच्या वसाहतींसाठी राखीव असल्याचे सांगण्यात आले. १९९१ मध्ये या भूखंडावर रुग्णालय व प्रसुतिगृहाचे आरक्षण ठेवण्यात आले. त्यामुळे ट्रस्टने १९९२ मध्ये पुन्हा अर्ज केला. त्या अजार्चा विचार झाला नाही. मात्र शिवसेना-भाजप युती शासनाने विख्यात हृदय शल्यविशारद नीतू मांडके यांच्या ट्रस्टला एक रुपया प्रति चौरसमीटर या दराने हा भूखंड ३० वर्षांसाठी भाडेपट्ट्याने दिला.

## 'मुख्यमंत्री माझी शाळा, सुंदर शाळा', हे अभियान म्हणजे जुन्याच उपक्रमांना नवा मुलामा - शाळांची नाराजी




**ठाणे :प्रतिनिधी**
राज्यात शासनामार्फत राबविण्यात आलेल्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा या अभियानाबात ठाणे जिल्ह्यातील काही शाळांनी नाराजी व्यक्त केली आहे. या अभियाना अंतर्गत स्थानिक शिक्षण विभागाकडून शाळांचे करण्यात आलेले मूल्यांकन गांभिर्यपूर्वक केले नसल्याचा आरोप काही शाळा प्रशासनाकडून करण्यात आला आहे. त्यामुळे शासनाच्या मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियानाचा एकप्रकारे बट्याबोळ झाल्याची खंत ठाणे शहरातीस काही शाळांनी व्यक्त केली आहे. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा योजनेअंतर्गत मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा अभियान १ जानेवारी २०२४ ते १५ फेब्रुवारी २०२४ पर्यंत राज्यात राबविण्यात आले. या अभियानात राज्यातील हजारोच्या संख्येने शाळा सहभागी झाल्या होत्या. यामध्ये शासकीय आणि खासगी शाळांचाही समावेश होता. शाळांच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्याचा शासनाचा उद्देश होता.

## मिरा- भाईंदर शहरातील शिवसेनाच्या बेकायदेशीर कंटेनर शाखांना पालिकेच्या नोटीसा

**भाईंदर, रोहित जैसवाल :**
मिरा रोड व भाईंदर शहरात रस्त्याच्या कडेला अथवा पदपथावर उभारण्यात आलेल्या शिवसेनेच्या कंटेनर शाखेला अखेर महापालिकेने नोटीसा बजावल्या आहेत. यात हे कंटेनर तात्काळ न हटावल्यास थेट कारवाई करणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. साधारण नोव्हेंबर महिन्याच्या सुरुवातीला मिरा रोड व भाईंदर शहरातील अनेक भागात रस्त्यावर तसेच पदपथावर कंटेनर ठेवून जवळपास ११ शिंदे गटाच्या शाखा उभारण्यात आल्या आहेत.



या शाखाचे उदघाटन स्थानिक आमदार प्रताप सरनाईकांच्या हस्ते करण्यात आले होते. कोणतीही परवानगी न घेता बेकायदेशीरपणे उभारण्यात आलेल्या या शाखांवर भाजप व राष्ट्रवादी काँग्रेस वगळता सर्वच राजकीय पक्षाने आक्षेप घेतला होता. तर अशा शाखांना पुरवण्यात आलेल्या बेकायदेशीर वीज जोडणीवर अदानी वीज समूहाकडून तीन वेळा कारवाई करण्यात आली होती. मात्र राजकीय पुढार्यांच्या दबावाखाली महापालिकेने याकडे दुर्लक्ष केले होते. मागील काही दिवसात शहरातील भाजप व शिवसेनायातील अंतर्गत वाद उफाळून आला आहे.त्यामुळे शहरातील बेकायदेशीर शाखांवर कारवाई करण्याची मागणी आता भाजप कडून ही करण्यात आली आहे. इतकेच नव्हे तर अशा शाखांवर प्रशासनाने कारवाई न केल्यास येत्या काळात भाजपच्या देखील कंटेनर शहरभरात दिसून येतील.

## ठाणे कारागृहातील बंद्यांकरीता स्मार्टकार्ड दुरध्वनी सुविधा, वॉशिंग मशिन युनिटचे उदघाटन



**ठाणे, विशाल कारंडे :**
ठाणे मध्यवर्ती कारागृहामध्ये बंद्याकरीता स्मार्टकार्ड दुरध्वनी सुविधा,वॉशिंग मशिन, दुरदर्शन संच,ई मुलाखत युनिट इत्यादीचे उदघाटन व आयुष्यमान भारत कार्ड, श्रमीक कार्ड चे वितरण पोलीस महासंचालक (निवृत्त) अहमद जावेद, अपर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवाचे अमिताभ गुप्ता, आदी मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले. यावेळी कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई, ठाणे मध्यवर्ती कारागृहाचे अधीक्षक राणी भोसले, आणि इतर अधिकारी व कर्मचारी हे उपस्थित होते. येथील कारागृहात क्षमतेपेक्षा सरसरी पेक्षा जास्त बंदी दाखल असल्याने प्रचलित सुविधा देण्यात मयार्दा येत होत्या. काळानुरुप आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देऊन कारागृहातील सर्वांना बंद्यांना त्याच्या कुटुंबियांशी,वकीलाशी संवाद साधण्याच्या प्रचजित धोरणात व तंत्रज्ञानात, सुविधांमध्ये सुधारणा या सुविधा उपलब्ध करून देत त्यांचे आज उद!घाटन करण्यात आले. या ठाणे मध्यवर्ती कारागृहात सध्यसिथतीत सरासरी चार हजार २०० पुरुष बंदी व १३३ महिला बंदी दाखल आहेत. सर्व विभागातील बॅरेक च्या बाहेरील बाजूस एलन ग्रुप,कंपणी द्वारे २० नग स्मार्टकार्ड दुरध्वनी संच बसविण्यात येऊन फोन सुविधे करीता आवश्यक स्मार्ट कार्ड पुरविण्यात आलेले आहे. स्मार्टकार्ड मध्ये बंद्यांचे नातेवाईक व वकील यांचे एकूण तीन फोन क्रमांक जतन केलेले असतील त्या मोबाईल क्रमांकावरच बंदी स्मार्टकार्डद्वारे कॉल करु शकनार आहेत. स्मार्टकार्डच्या माध्यमातून ज्या बंद्यांच्या फोन नंबरची पडताळणी झालेली आहे,अशा सर्व बंद्यांना आठवडयातून तीनवेळा प्रत्येकी सहा मिनीटे देण्यात येणार आहेत. फोन सुविधेकरीता बंद्यांना प्रति मिनीट एक रुपये प्रमाणे शुल्क ठेवण्यात आलेले आहे.

## मुंबईतील ८ रेल्वे स्थानकांची नावे बदलणार; ब्रिटिशकालीन नावे होणार इतिहासजमा

**मुंबई, भावना जैन :**
भारतावर ब्रिटीशांनी राज्य केलं तेव्हा त्यांच्यानुसार सर्व कारभार चालत होता. ब्रिटीशांनी त्यांच्या काळात मुंबईतील अनेक स्थानकांना नावे दिली होती. आता ब्रिटीश भारतात नाहीत, भारताला स्वातंत्र्य मिळून जवळपास ७७ वर्षांचा काळ लोटला आहे. मात्र अद्यापही त्यांनी रेल्वे स्थानकांना दिलेली नावे तशीच आहेत. ही नावे आता लवकरच बदलणार आहेत. याला मुख्यमंत्र्यांकडून तत्वतः मान्यता देण्यात आली असून मंत्रिमंडळ बैठकीत निर्णय होऊन केंद्र सरकारकडे तसा प्रस्ताव पाठवण्यात येणार आहे.

शिवसेना लोकसभा गटनेते खासदार राहुल शेवाळे यांनी




याबाबत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्र लिहिलं आहे. मुंबईतील अनेक रेल्वे स्थानके ब्रिटीश कालीन नावाने ओळखली जातात. त्यामुळे सदर स्थानकांची नावे स्थानिक इतिहास पहाता नामांतरीत करणे महत्वाचे आहे. त्यामुळे मी आपणास मुंबईतील स्थानकांचे नामांतरण करण्याची सूची पत्रात नमुद करत आहे. तरी आपणास विनंती आहे की, पत्रातील नमुद स्थानकांची नावे बदलण्याकरीता आपण तातडीने संबंधीत अधिकाऱ्यांना निर्देश द्यावेत, असे शेवाळे यांनी पत्रात लिहिले आहे.

**सध्या असलेली रेल्वेस्थानकांची नावे, रेल्वे स्थानकांचे प्रस्तावित नावे**

१. करी रोड (लालबाग)
२. सॅन्डहर्स्ट रोड (डोंगरी)
३. मरीन लाईन्स (मुंबादेवी)
४. चर्नी रोड (गिरगांव)
५. कॉटन ग्रिन (काळाचौकी)
६. डॉकयार्ड (माझगांव)
७. किंग्ज सर्कल (तिर्थकर पार्श्वनाथ)
८. मुंबई सेंट्रल (नाना जगन्नाथ शंकर शेट)

याआधी देखील रेल्वे स्थानकांची ब्रिटीश कालीन नावे बदलण्यात आली आहे. एल्फिस्टन या ब्रिटीश कालीन स्थानकाचे नाव आता प्रभादेवी करण्यात आले आहे.

## उल्हासनगरातील २७ हजार अनधिकृत बांधकामे नियमित ; केवळ १० टक्के दंड आकारणी; राज्य सरकारचा निर्णय

**मुंबई, प्रतिनिधी**
लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर उल्हासनगरातील २७ हजार अनधिकृत बांधकामे शिघ्र सिद्धगणकाच्या (रेडी रेकनर) १० टक्के भोगवटा शुल्क आकारणी करून नियमित करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यापूर्वी दंड आकारून बांधकामे नियमित करण्याचा निर्णय अयशस्वी ठरला होता. फाळणीनंतर पश्चिम पाकिस्तानमधून आलेल्या नागरिकांचे उल्हानगरात पुनर्वसन करण्यात आले असून १३५० हेक्टर क्षेत्रफळाच्या उल्हासनगर महापालिकेत ३० टक्के म्हणजेच सुमारे २७ हजार अनधिकृत बांधकामे आहेत. गुजरातमधील अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी तेथील सरकारने सन



२००१ मध्ये केलेल्या कायद्याच्या आधारे राज्यातही तत्कालीन आघाडी सरकारने सन २००६मध्ये उल्हासनगरमधील अनधिकृत बांधकामे नियमित करण्याचा निर्णय घेतला होता. त्यावेळी ही अनधिकृत बांधकामे नियमित करण्यासाठी प्रति चौरस मीटर २२०० रुपये तर सरकारी जागेवरील अनधिकृत बांधकामासाठी जिल्हाधिकारी निश्चित करतील त्याप्रमाणे दंड आकारणी करण्याची तरतूद या कायद्यात करण्यात आली होती.

# रवा इडली



**साहित्यः** रवा २ वाट्या (उपम्यासाठी वापरतो तो गव्हाचा मध्यम जाडसर रवा), उडीद डाळ १ वाटी, तेल १ छोटा चमचा, मिठ चवीप्रमाणे, खायचा सोडा ऐच्छिक (गरज वाटलीच तर).

**कृतीः** २ वाट्या रवा (उपम्यासाठी वापरतो तो जाडसर रवा) बंद डब्यात ठेवून कूकरमध्ये कोरडाच वाफवून घ्यायचा. १ वाटी उडीद डाळ साधारण चार तास भिजवून वाटून घ्यायची. पाणी फार वापरायचे नाही. रवा थोडा थंड झाल्यावर पाण्याने धुऊन वाटलेल्या डाळीत मिक्स करायचा. रवा वाफवून नंतर धुऊन घेतल्याने हलका होतो. चवीपुरते मीठ घालून बॅटर रात्रभर (किंवा सहा सात तास) ठेवून द्यायचे. मस्त पीठ फुगते. इडल्या करण्याआधी एक चमचा तेल आणि एक चमचा पाणी मिक्स करून ते त्या बॅटरमध्ये घालून इडल्या बनवायच्या. मस्त स्पॉन्जी जाळीदार इडल्या होतात.

## इडलीचे पीठ चांगले येण्यासाठी...

- उडीद डाळ वाटताना जास्त पाणी वापरायचे नाही.
- पण डाळ भिजवलेले पाणी फेकून न देता रवा मिक्स करून बॅटर तयार करताना वापरायचे. म्हणजे पीठ छान येते (फुगते/ आंबते). पीठ पळीवाढे असावे. म्हणजे सहा-सात तासांनी चांगले फुगते.
- वाटीभर भात (उरलाच असेल आणि संपवायचा असेल तर) वाटून या पिठात मिक्स केला तरी चालतो.
- काही वेळा थंडीमुळे पीठ आले नाही किंवा इडल्या लवकर बनवायच्या असतील तर चिमूटभर सोडा, चमचाभर पाणी आणि चमचाभर तेल मिक्स करून पिठात घालायचे.
- ज्यांना तांदूळ चालत नाही त्यांच्यासाठी हा चांगला पर्याय आहे.

# लिपस्टिक वापरताय... जरा काळजी घ्या

**बोस्टन** लेड पॉयझनिंग प्रिव्हेन्शन प्रोग्रॅमच्या खाली या तपासण्या केल्या गेल्या. संस्थेचे वैद्यकीय संचालक डॉ. सीन पालफ्रे याविषयी माहिती देताना म्हणाले की, लिपस्टिकसारखी सौंदर्यप्रसाधने वापरताना ती पूर्ण सुरक्षित हवीत यात संशय नाही. लिपस्टिक लावलेल्या ओठावरून अनेक वेळा जीभ फिरविली जाते, त्यामुळे अंश पोटात जात असतो. यात वापरण्यात येणाऱ्यात शिशाची पातळी धोकादायक असून त्यामुळे मानसिक आरोग्याला धोका निर्माण होतो. याचा थेट परिणाम बुद्धी आणि स्मरणशक्तीवर होतो. परिणामी बुद्ध्यांक कमी होतो आणि तरुण वयातील मुलींमध्ये शिकण्याची क्षमताही घटू शकते. गरोदर महिलांनी असल्या लिपस्टिक वापरल्या तर त्याचा परिणाम गर्भातील बाळावर होतो.

शिसे हा विषारी धातू आहे, मात्र त्याचे लिपस्टिकमधील प्रमाण किती असावे यावर अन्न व औषध विभागाचेच नियंत्रण नाही, तर हे नियंत्रण संबंधित कंपन्यांवरच आहे. त्यामुळे किती प्रमाणात शिसे वापरले जाते हे त्या उत्पादकांवर अवलंबून असते. शिशाचे प्रमाण जाणूनबुजून वाढवले जात नसले तरी ज्या खनिजांपासून लिपस्टिकचे विविध रंग तयार होतात त्यात शिसे असतेच. आज लिपस्टिकच्या ४०० लोकप्रिय शेड्स बाजारात आहेत. लोरियाल, मेबेलिन, कव्हर गर्ल्स, नार्स, स्ट्रगेझर या नामवंत कंपन्या पहिल्या दहा नंबरच्या उत्पादकात आहेत, मात्र त्यांच्याही लिपस्टिकमध्ये शिसे धोकादायक पातळीत आहे, असेही पालफ्रे यांना तपासणीत आढळून

> बाजारात उपलब्ध असलेल्या विविध प्रकारच्या लिपस्टिकमध्ये शिसासारखे विषारी धातूचे प्रमाण चिंताजनक असल्याचे प्रयोगशाळेत करण्यात आलेल्या तपासणीतून उघडकीस आले आहे. यात २२ नामवंत लिपस्टिक ब्रँडचाही समावेश आहे.



# उन्हाळ्यात रोज रात्री आंघोळ केल्याने होतील हे ४ फायदे

बाहेरील तापमान वाढल्यानंतर याचा परिणाम शरीरावर देखील होत आहे. सूर्य दिवसागणिक आग ओकतच चालला आहे. उन्हाचा कहर वाढत चालल्याने स्वास्थ्यावर परिणाम होत चालला आहे. सकाळी आंघोळ करून आपण घरातून निघालो की तेव्हापासून घामाच्या धारा यायला सुरुवात होते. घामामुळे त्वचा ओलसर होऊन धूळ आणि माती शरीराला चिकटू लागते. यामुळे शरीरावर घाम आणि मळ जमा होतो. तसेच अति घामामुळे शरीराला दुर्गंधी येऊ लागते. या साऱ्यातून वाचण्यासाठी काही लोक घरी जाऊन आंघोळ करतात तर काही हात-पाय धुऊन कपडे बदलतात. दिवसाच्या सुरुवातीला तर सर्वच अंघोळ करतात, पण तुम्ही जर रात्रीही अंघोळ करत असाल तर त्वचेसंदर्भातील आजारापासून दूर राहू शकाल. गरमीमध्ये जर तुम्ही रात्री अंघोळ नाही केली तर त्वचेसंदर्भात अनेक आजार तुम्ही ओढवून घेऊ शकता. रात्री घरी आल्यानंतर तुम्ही अंघोळ करत असाल तर तुमचा दिवसभराचा थकवा दूर झाला असेल. तन आणि मनाने तुम्ही फ्रेश असाल. तुम्हाला शांत झोप येऊ शकेल. याचे काय काय फायदे आहेत याबद्दल जाणून घेऊया...



**हृदय स्वास्थ्य :** रात्रीच्या वेळी रक्ताचा प्रवास शांत गतीने होत असतो. अशावेळी तुम्ही स्वच्छ पाण्याने स्नान कराल तर रक्त प्रवाह खूप चांगला होईल. हृदयावरही याचा सकारात्मक परिणाम होतो. जर तुम्हाला तुमच्या हृदयाचे स्वास्थ्य हवे असेल तर तुम्हाला रात्रीच्या आंघोळीची सवय लावायला हवी.

**फ्रेश वाटेल :** गरमीच्या दिवसात ऊन, धूळ आणि घामामुळे शरीरावर मळ जमा होतो. रात्रीच्या अंघोळीने शरीर स्वच्छ होते. आंघोळीनंतर तुम्ही फ्रेश आणि ताजेतवाने होता. यामुळे तुमची त्वचा देखील चमकत राहील.

**शांत झोप येईल :** गरमीमुळे तणाव आणि शरीर दमल्यासारखे होते. अशावेळी रात्रीच्या आंघोळीने शरीराचा तणाव कुठच्या कुठे जाईल आणि अंथरुणात पडल्या पडल्या तुम्हाला झोप येईल.

# जर बाळाला बाटलीतून दूध देत असाल तर सावधान...

**जर** तुम्ही तुमच्या बाळाला बाटलीमधून दूध देत असाल तर सावधान... बाटलीमधील दूध तुमच्या बाळाच्या आरोग्यासाठी फार घातक ठरण्याची शक्यता आहे. लहान मुलांना दूध पाजण्यासाठी वापरण्यात येणाऱ्या दूधाच्या बाटलीमध्ये मोठ्या प्रमाणात घातक रसायनांचा समावेश करण्यात येतो. एका संशोधनातून ही बाब समोर आली आहे. डॉक्टरही दूध पाजण्यासाठी दुधाची बाटली न वापरण्याचा सल्ला देतात.

दुधाची बाटली आणि सिपरमध्ये घातक रसायन असल्याचे संशोधनातून साध्य झाले आहे. हे रसायन मुलाच्या आरोग्यस घातक आहे. 'बिस्फेनॉल-ए' नावाच्या रसायनाचा समावेश दुधाची बाटली आणि सिपरमध्ये असतो.

केलेल्या संशोधनात १४ दुधाच्या बाटल्या आणि ६ सिपरचे नमुने घेण्यात आले होते. हे नमुने दिल्ली व्यतिरिक्त गुजरात, राजस्थान, केरळ, आंध्र प्रदेश, झारखंड, महाराष्ट्र, मणिपूरमधून घेण्यात आले होते. घेण्यात आलेल्या नमुन्यांचे निरीक्षण इंडियन इन्स्टिट्युट ऑफ टेक्नॉलॉजी, गुवाहाटीमध्ये करण्यात आले. ज्यामध्ये हे स्पष्ट झाले की, बाटलीतील रसायने मुलांच्या शरीरात पोहोचत आहेत.

डॉक्टर तपीशा गुप्ता यांनी दिलेल्या माहितीनुसार, बाटलीमधून मुलांना सतत दूध दिल्यास त्यांच्या गळयाला सूज आणि उलटी होण्याची शक्यता आहे. डायरिया सुद्धा होऊ शकतो. म्हणून नेहमीच मेडिकेटेड बाटली वापरा. वैद्यकीय स्टोअरमध्ये चांगल्या दर्जाच्या दुधाच्या बाटल्या उपलब्ध आहेत.


पॉली कार्बोनेटच्या मदतीने तयार करण्यात आलेल्या बेबी बॉटलवर बीआयएसने बंदी घातली होती. २०१५ साली बेबी बॉटलवर बंदी घातली होती. त्यानंतरही या बाटल्या मार्केटमध्ये सर्रास विक्रीसाठी उपलब्ध आहेत. लहान मुलांच्या आजारांसाठी मुख्य कारण दुधाच्या बाटल्या आहेत.



# फोनचे स्टोअरेज वारंवार फुल होतेय?

## एका झटक्यात समस्या सोडवा, पाहा टिप्स अँड ट्रिक्स

**अनेक वेळा अनेक जणांना स्मार्टफोनचा वापर करताना स्टोअरेज फुल होत असल्याची समस्या वारंवार येत असते. तुमच्या फोनचे स्टोअरेज कमी झाले असेल तसेच तुम्हाला वारंवार तुम्हाला नोटिफिकेशन येत असेल तर तुमचा फोन हाय स्पीडने काम करू शकत नाही. आज आम्ही तुम्हाला अशाच काही खास टिप्स आणि ट्रिक्ससंबंधी माहिती देत आहोत. या ट्रिक्सचा वापर केल्यास तुम्हाला नक्कीच फायदा मिळू शकतो.**



**क्लीअर करा ॲप कॅशे**

तुमच्या फोनमध्ये अनेक कॅशे फाइल्स स्टोअर होत असतात. फोनचे स्टोअरेज भरण्यासाठी हे सुद्धा एक महत्त्वाचे कारण आहे. तुमच्या मोबाईलमध्ये अनेक ॲप ओपन करत असतात. तुमच्या फोनमध्ये ॲपचे कॅशे फाइल्स जमा होत असतात. त्यामुळे तुम्हाला सल्ला आहे की, वेळोवेळी फोनमधून कॅशे फाइल्सला क्लीअर करत राहायला हवे. असे केल्याने फोनची स्टोअरेज रिकामे राहते. तसेच फोन सुद्धा स्लो होत नाही.

**क्लाऊड स्टोअरेजचा वापर करा**

जर तुमच्या फोनचे स्टोअरेज वारंवार फुल होत असेल तर यासाठी सर्वात खास ऑप्शन म्हणजे फोनमधील फोटो आणि व्हिडीओ फाइल्सला क्लाऊड स्टोअरेजवर ट्रान्सफर करा. याचा एक फायदा होईल. तो म्हणजे नंतर तुम्ही या फोटो किंवा व्हिडीओला कुठूनही ॲक्सेस करू शकाल. मग तुमच्या जवळ फोन असो की नाही. तसेच दुसरा फायदा म्हणजे स्टोअरेज फुल होण्याची भीती नाही.

**स्मार्टफोनमधून हटवा अनावश्यक ॲप्स**

तुमच्या फोनमध्ये जर अनावश्यक ॲप्स असतील तर ते फोनमध्ये ठेवण्यात काहीच अर्थ राहत नाही. ते डिलीट किंवा काढून टाकणे गरजेचे आहे. या ॲप्समुळे स्टोअरेज नेहमी फुल होत असते. त्यामुळे सर्वात आधी चेक करा की, तुमच्या फोनमध्ये अनावश्यक ॲप्स किती आहेत. नंतर त्यांना अनइन्स्टॉल करा.

# राधिका मर्चंटची बहीण सुद्धा आहे करोडपती

अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंगची चर्चा आजही आपल्याला पाहायला मिळत आहे .या सोहळ्यात अनेक बॉलिवूड तसेच हॉलिवूड कलाकारांनी सहभाग घेतला होता.अंबानींच्या या भव्यदिव्य फंक्शनमध्ये एक खास व्यक्ती मात्र जबरदस्त चर्चेत आली आहे . ती इतर कोणी नसून अनंत अंबानी यांची मेहुणी आणि राधिका मर्चंट हिची मोठी बहीण अंजली मर्चंट मजिठिया आहे.एनकोअर फार्मस्युटिकल्सचे सीईओ वीरेन मर्चंट आणि त्यांची पत्नी शैला मर्चंट यांची मोठी मुलगी अंजली मर्चंट मजिठिया ही आहे. तर राधिका ही त्यांची छोटी मुलगी आहे. अंजली मर्चंट मजिठियाचा जन्म 1989 मध्ये मुंबईत झाला आहे . तिने द कॅथेड्रल जॉन कॉनन स्कूल आणि एकोल मोंडियाले वर्ल्ड स्कूल मधून शिक्षण पूर्ण केलं. शालेय शिक्षण पूर्ण झाल्यानंतर तिने बॅबसन कॉलेजमधून स्ट्रॅटेजिक मॅनेजमेंट आणि उद्योजकतेमध्ये बीएससीची पदवी संपादित केली. अंजली ही दिसायला तर सुंदर आहे सोबतच ती हुशार सुद्धा आहे .अंजली ही स्वतः उद्योजिका आहे . ती टर्न द कॅम्पस या ऑनलाइन मार्केटप्लेसची सहसंस्थापिका आहे. अंजली ही ड्रायफिक्स चीही सहसंस्थापिका आहे. 2018 मध्ये याची स्थापना झाली आहे. ड्राय फिक्स ही कंपनी हेअर स्टायलिंग आणि ट्रिटमेंट क्लब्सची चेन आहे.यामध्ये अनेक नामवंत व्यक्ती ट्रीटमेंट घेत असतात .बॉलिवूडमधील अनेक सितारे सुद्धा याच कंपनीत स्वतःच्या केसांसाठी ट्रीटमेंट घेतात. अंजलीचे लग्न हे चारवर्षांपूर्वी झालं आहे. 2020 मध्ये बिझनेसमॅन अमन मजिठियाशी तिने लग्न केलं आहे. वॅटली इंडिया या कपड्यांच्या ब्रँडचे ते संस्थापक आहेत. अनंत अंबानी आणि राधिका मर्चंट यांच्या प्री-वेडिंगमधील अंजलीचेही बरेच फोटो व्हायरल झाले आहेत. राधिका ही अंजलीपेक्षा लहान असली तरी दोघी बहिणींमध्ये चांगला बॉंड निर्माण झाला आहे. दोघीसुद्धा स्वतःचा इ४रील्ली२२ स्वतः सांभाळतात.राधिका आणि अनंत अंबानींच्या प्री वेडिंग शो मध्ये ती सर्वात जास्त प्रकाशझोतात आली आहे .



## दै. लोकरक्षणाय सुडोकू - ३१

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 7 | | 5 | | | | 9 | |
| | 3 | | | | 7 | | | 8 |
| | | | | | 2 | 4 | | 5 |
| | | | 7 | | 6 | | 3 | 1 |
| 1 | | | 8 | | | | | |
| 6 | | | 4 | | 3 | 9 | | |
| | 1 | 5 | | | | 3 | | 9 |
| | 2 | 8 | 9 | | | | 6 | |
| | | | | | | | 2 | |


## उत्तर सुडोकू -३०

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 9 | 1 | 8 | 6 | 3 | 2 | 7 | 4 | 5 |
| 3 | 5 | 2 | 7 | 4 | 9 | 6 | 8 | 1 |
| 4 | 7 | 6 | 5 | 8 | 1 | 2 | 9 | 3 |
| 6 | 8 | 9 | 1 | 5 | 4 | 3 | 7 | 2 |
| 5 | 2 | 7 | 8 | 6 | 3 | 9 | 1 | 4 |
| 1 | 3 | 4 | 2 | 9 | 7 | 5 | 6 | 8 |
| 2 | 4 | 5 | 9 | 1 | 6 | 8 | 3 | 7 |
| 7 | 9 | 1 | 3 | 2 | 8 | 4 | 5 | 6 |
| 8 | 6 | 3 | 4 | 7 | 5 | 1 | 2 | 9 |

एक ते नऊ आकडे आडव्या व उभ्या सरळ रेषेत अशा प्रकारे भरायचे की एका रेषेत एक आकडा एकदाच आला पाहिजे. प्रत्येक सरळ रेषेत आणि ३ बाय ३ च्या प्रत्येक लहान चौकात सर्व एक ते नऊ आकडे आलेच पाहिजेत. आधीच्या छापील आकड्यांची अजिबात हलवाहलव करायची नाही. प्रत्येक कोड्याला एकच उत्तर आहे.

# आलियासाठी रणबीर स्वतःच काम सोडून येतो

आलिया भट आणि रणबीर कपूर ही बॉलीवूडची प्रसिद्ध जोडी आहे. आणि आता आलिया आणि रणवीर आई बाबाही झाले आहेत. त्यांना राहा नावाची मुलगी सुद्धा आहे. पण आलियाला जेव्हा शूटला जायचं असतं तेव्हा तिची चांगलीच तारांबळ उडते आणि त्यावेळी रणबीर मात्र आपलं काम सोडून तिच्याजवळ हजर असतो. असं तिने सांगितले आहे . पण नक्की आलिया तिच्या नात्याबद्दल काय म्हणते ? यासाठी संपूर्ण लेख वाचाआलिया ह्यकॉफी विथ करणह्ण या शोमध्ये हे वक्तव्य केलं आहे.ती म्हणते की, ह्णगरोदरपणा नंतर शरीरात अनेक बदल होतात. आजही मला अनेक बदलांना सामोरे जावे लागत आहे . जेव्हा मी शूट साठी घराबाहेर पडते तेव्हा राहाला सोडून जावं लागतं आणि त्यामुळे आपल्या मुलीसोबत न राहण्याचे गिल्ट सुद्धा मला वारंवार वाटतं. कधी कधी घर शूट यामध्ये मी गोंधळून जाते आणि मला काय करावं सुचत नाही. अशावेळी जेव्हा रणबीरला मी कॉल करते तेव्हा तो नेहमी आपलं काम सोडून मला न्यायला येतो आणि त्यामुळेच मी रिलॅक्स फील करतेअसं आलियाने करणच्या शो मध्ये सांगितले आहे. यावेळी बॉलिवूडची बेबो म्हणजे करीन कपूरही तिच्या सोबत होती.रणबीर नेहमीच एक वडील म्हणून त्याचबरोबर पती म्हणून योग्य आहे असं आलिया सांगत असते. त्याचबरोबर आलियाने आपल्या मुलीच्या फोटोज विषयी सुद्धा विधान केलं होतं. ती म्हणते की, राहाचे फोटोज सोशल मीडियावर व्हायरल होतात आणि मला याची कुठेच भीती वाटत नाही असं नाही,पण ती अजून खूप लहान आहे तिचा कंटेंट साठी इंस्टाग्राम किंवा सोशल मीडियावर वापर व्हावा असं मला वाटत नाही.



## दिनविशेष

### १४ मार्च

- १९३१: पहिला भारतीय बोलपट आलम आरा मुंबई मध्ये प्रदर्शित झाला.
- १९५४: दिल्ली येथे साहित्य अकादमीची स्थापना झाली.
- १९६७: अमेरीकेचे माजी अध्यक्ष जॉन एफ. केनेडी यांचे पार्थिव आर्लिंग्टन राष्ट्रीय दफनभूमी येथे हलविण्यात आले.
- २०००: कलकत्ता येथील टेक्निशियन आय हा देशातील सर्वात जुना स्टुडिओ आगीच्या भक्ष्यस्थानी पडला.
- २००१: सिक्कीममधील आदिवासी समाजातील चोकीला अय्यर यांनी भारताच्या पहिल्या महिला परराष्ट्र सचिव म्हणून सूत्रे हाती घेतली.
- २००१: व्ही. व्ही. एस. लक्ष्मणने ईडन गार्डन वर नाबाद २७५ धावा काढून या मैदानावरील सर्वोच्च धावांचा सुनील गावसकरचा विक्रम मोडला. तसेच एका डावात ४४ चौकार मारण्याच्या डॉन ब्रॅडमन यांच्या विक्रमाची बरोबरी केली.
- २०१०: ज्येष्ठ कन्नड साहित्यिक डॉ. एस. एल. भैरप्पा यांच्या हस्ते लोकसंस्कृतीचे उपासक आणि संशोधक डॉ. रा. चिं. ढेरे यांना पुण्यभूषण पुरस्कार पुण्यात देण्यात आला.
- १८७४: फिलिप्स इलेक्ट्रॉनिक्स कंपनी चे सहसंस्थापक आंतोन फिलिप्स यांचा जन्म. (मृत्यू: ७ ऑक्टोबर १९५१)
- १८७९: नोबेल पारितोषिक विजेते जर्मन आणि अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ अल्बर्ट आईनस्टाईन यांचा जन्म. (मृत्यू: १८ एप्रिल १९५५)
- १८९९: इर्विंग ओईल कंपनी चे संस्थापक के. सी. इर्विंग यांचा जन्म. (मृत्यू: १३ डिसेंबर १९९२)
- १९०८: विन्सेंट मोटारसायकल कंपनी चे संस्थापक फिलिप व्हिन्सेंट यांचा जन्म. (मृत्यू: २७ मार्च १९७९)
- १९३१: ख्यातनाम अभिनेते प्रभाकर पणशीकर यांचा जन्म. (मृत्यू: १३ जानेवारी २०११)
- १९३३: ब्रिटिश अभिनेता मायकेल केन यांचा जन्म.
- १९६१: ब्लॅकबेरी लिमिटेड चे संस्थापक माईक लाझारीडीस यांचा जन्म.
- १९६३: ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू ब्रूस रीड यांचा जन्म.

## भविष्य

**मेष:** तुमचा इतरांवर प्रभाव राहील. व्यवसायात नवीन तंत्र व मंत्र अंमलात आणू शकाल. वस्तू गहाळहोणार नाही याची दक्षता घ्यावी.

**वृषभ:** महत्त्वाची कामे दुपारनंतर मार्गी लागतील. आरोग्याच्या तक्रारी जाणवतील. मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील.

**मिथुन:** वाहने जपून चालवावीत. अनेकांचे सहकार्य लाभेल.महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. प्रवास शक्यतो टाळावेत.

**कर्क:** राजकीय क्षेत्रात सहभागी व्हाल. महत्त्वाच्या गाठीभेटी पार पडतील. तुमच्या कार्यक्षेत्रात मानसन्मान, प्रतिष्ठा लाभेल. शासकीय कामे मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल.

**सिंह:** एखादी गुप्त वार्ता समजेल. हितशत्रुंचा त्रास संभवतो. राजकीय व सामाजिक क्षेत्रात सहभागी व्हाल. मानसन्मान व प्रतिष्ठा लाभेल. भागीदारी व्यवसायातील निर्णय मार्गी लागतील.

**कन्या:** मुलामुलींचे प्रश्न मार्गी लागतील. खचार्चे प्रमाण वाढेल. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल. एखादी भाग्यकारक घटना घडेल. कौटुंबिक जीवनात सुसंवाद साधाल.

**तुला:** प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वादविवाद टाळावेत. इतरांच्या सहकायार्ची अपेक्षा नको. एखादी महत्त्वाची वार्ता समजेल.

**वृश्चिक:** जिद्दीने कार्यरत रहाल. नातेवाईकांचे सहकार्य लाभेल.वरिष्ठांबरोबर मतभेदाची शक्यता. महत्त्वाची कामे रखडण्याची शक्यता. काहींचा धार्मिक कार्यात सहभाग होईल.

**धनु:** आर्थिक लाभाचे प्रमाण समाधानकारक राहील. मनोबल उत्तम राहील.वस्तू गहाळ होणार नाही याची दक्षता घ्यावी. नोकरी, व्यवसायात समाधानकारक स्थिती राहील.

**मकर:** आरोग्याच्या तक्रारी कमी होतील. तुमच्या कार्यक्षेत्रात सुसंधी व प्रसिद्धी लाभेल. उत्साह व उमेद वाढविणारी एखादी घटना घडेल. आरोग्य उत्तम राहील.वेळ व पैसा वाया जाण्याची शक्यता.

**कुंभ:** काहींना कामाचा ताण व दगदग जाणवेल. मानसिक अस्वस्थता जाणवेल.अनेकांचे सहकार्य लाभेल. महत्त्वाचे पत्रव्यवहार पार पडतील. जोडीदाराची अपेक्षित साथ लाभेल. वरिष्ठांचे सहकार्य लाभेल.

**मीन:** मित्रमैत्रिणींचा सहवास लाभेल. महत्त्वाचे पत्र व्यवहार पार पडतील. वादविवाद टाळावेत. शासकीय क्षेत्रात सुसंधी लाभेल. तुमचे कार्यक्षेत्र वाढणार आहे. मनोरंजनाकडे कल राहील. प्रॉपटीर्चे नवीन प्रस्ताव समोर येतील.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k.industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no.12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist.Thane-401107, Maharashtra. editor : Rakesh Shankar Gore. RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118. Office contact no. 97023 86118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

संपादकीय

# निवडणूक एक्स्प्रेस सुसाट!

आगामी लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर केंद्र शासनाने विविध विकासकामे आणि योजनांचा भडिमार चालवला आहे. वंदे भारत ट्रेनला फक्त पंतप्रधान नरेंद्र मोदी हेच हिरवा झेंडा दाखवत आहेत. त्याप्रमाणे त्यांनी सोमवारी देशातील विविध शहरे जोडर्णाया १० वंदे भारत ट्रेननाही झेंडा दाखविला. केंद्राच्या विविध योजना सध्या आणल्या जात असून त्यावर लाखो कोटींचा खर्च केला जाणार आहे. लोकांचा पैसा आणि लोकांसाठीच योजना आणताना त्याचा वापर मात्र स्वतःची राजकीय पोळी भाजून घेण्यासाठी केला जात आहे. विविध विकासकामांची उद्घाटने करण्यासाठी पंतप्रधान मोदी पायाला भिंगरी लावल्याप्रमाणे देशभर फिरत आहेत. इकडे महाराष्ट्रातही विविध विकासकामांचा सपाटा लावण्यात आला आहे. भाजपची सत्ता असलेल्या इतर राज्यांतूनही हेच चालले आहे. त्यामुळे या पक्षाची निवडणूक एक्स्प्रेस सुसाट चालली आहे. या एक्स्प्रेसला सोयीच्या ठिकाणी ह्यथांबेह्न दिलेले असल्याने जनताही खूश होत असल्याचा समज भाजपच्या नेत्यांनी करून घेतला आहे. हे सर्व कमी म्हणून की काय सोमवारी नागरिकत्व सुधारणा कायदा (सीएए), २०१९ देशभरात लागू करण्याची अधिसूचना केंद्र सरकारने जारी केली आहे. यावर अपेक्षेप्रमाणे विरोधकांनी टीकास्त्र सोडत हा निवडणूक जुमला असल्याचे म्हटले आहे. ५ वर्षांपूर्वी देशाच्या संसदेमध्ये हा कायदा मंजूर झाला होता. त्याची अंमलबजावणी करण्याचा मुहूर्त मात्र लोकसभा निवडणुकीच्या तोंडावर शोधण्यात आला आहे. निवडणूक रोखे घोटाळ्यावरून सर्वोच्च न्यायालयाने स्टेट बँक ऑफ इंडियाला फटकारल्यानंतर काही वेळातच सीएएची अधिसूचना जारी होते हा काही योगायोग म्हणता येणार नाही. काश्मीरमधून ३७० कलम हटवल्यानंतर सीएएचा घेतलेला हा मोठा निर्णय म्हणता येईल. यात मुस्लिमांना वगळण्यात आल्याने एआयएमआयएमसह विरोधकांनी टीकेची तोफ डागली आहे. या कायद्यामुळे पाकिस्तान, बांगलादेश, अफगाणिस्तान या देशातून आलेल्या मुस्लिमेतर स्थलांतरितांना भारताचे नागरिकत्व देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. ३१ डिसेंबर २०१४ पूर्वी भारताच्या आश्रयाला आलेल्या हिंदू, बौद्ध, जैन, शीख, पारशी आणि ख्रिश्चन या धार्मिक अल्पसंख्याकांना सीएएमुळे थेट नागरिकत्व मिळणार आहे. यात मुस्लीम धर्मियांना वगळण्यात आले आहे. सध्या भारताचे नागरिकत्व मिळविण्यासाठी ११ वर्षांची असलेली अट सीएएमध्ये शिथिल करून ती ६ वर्षांवर आणली आहे. याकरिता कोणतीही कागदपत्रे लागणार नसून विशेष पोर्टलवर नागरिकत्वाची ऑनलाईन नोंदणी करावी लागणार आहे. सन २०१९ मध्ये हा कायदा संमत झाला तेव्हा त्याला कडाडून विरोध झाला होता. दोन्ही सभागृहांत त्याला मंजुरी मिळाल्यानंतर त्याचे कायद्यात रूपांतर झाले. विरोधामुळे सीएएची अंमलबजावणी लांबणीवर पडली होती. त्यासाठी २०२४ चे टायमिंग साधण्यात आले. याला कसा प्रतिसाद मिळतोय हे पाहण्यासाठी काही काळ थांबावे लागेल. १ एप्रिल ते ३१ डिसेंबर २०२१ पर्यंत चौदाशेहून अधिक मुस्लिमेतर अल्पसंख्याकांना नागरिकत्व देण्यात आले आहे. सीएएच्या अधिसूचनेला विरोधकांनी अपेक्षेप्रमाणे विरोध केला आहे. केंद्र सरकारने संसदीय लोकशाही पद्धतीवर उगवलेला सूड असल्याचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांनी म्हटले आहे, तर काँग्रेसचे नेते जयराम रमेश यांनी निवडणूक रोख्यांच्या मुद्यावरून सर्वोच्च न्यायालयाने ओढलेले ताशेरे झाकण्यासाठी केंद्राने हा प्रयत्न केल्याचे सांगितले आहे. तसेच पश्चिम बंगाल आणि आसाममध्ये मतांचे ध्रुवीकरण करण्याचे हे कारस्थान असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. एआयएमआयएमचे असदुद्दिन ओवैसी यांनीही काहीशी अशीच प्रतिक्रिया व्यक्त केली आहे, तर ऑल आसाम स्टुडंट्स युनियनने (एएएसयु) सीएएविरोधात न्यायालयात जाण्याचा इशारा दिला आहे. केरळमध्ये हा कायदा लागू केला जाणार नसल्याचे मुख्यमंत्री पिनराई विजयन यांनी स्पष्ट केले आहे. सीएएला शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाने विरोध केल्यानंतर ठाकरे यांची शिवसेना हिंदूविरोधी कधी झाली, असा कळीचा सवाल भाजपने उपस्थित केला आहे. पाकिस्तान, अफगणिस्तान, बांगलादेश या देशात छळ झालेल्या आणि भारताच्या आश्रयाला आलेल्या मुस्लिमेतर नागरिकांना या देशाचे नागरिकत्व मिळण्याचा मार्ग प्रशस्त झाला असला तरी यातून मुस्लिमांना वगळण्यात आले आहे. काँग्रेससह भाजप विरोधक याला पुढेही विरोध करणार असल्याने निवडणुकीच्या प्रचारात विशेषतः मुस्लीमबहुल भागात हा मुद्दा विरोधक तापवण्याचा प्रयत्न करणार हे सांगण्यासाठी कुणा राजकीय पंडिताची गरज नाही. आगामी लोकसभा निवडणूक कोणकोणत्या मुद्यांवरून गाजणार हे अद्याप स्पष्ट होत नसले तरी जातीपातीचे मुद्दे उकरून काढले जाण्याची शक्यता नाकारता येत नाही. तूर्त देशाला विद्वेषाचे राजकारण परवडणारे नाही, मात्र निवडणुकीत विद्वेषाचाच मुद्दा अधिक तापवला जाण्याची शक्यता आहे. निवडणूक एक्स्प्रेस सुसाट निघालेली असताना योजनांचा सुकाळ असल्याने जनता खूश असल्याचा समज झालेला आहे. राजकारणात जनतेच्या पैशांतून आपला प्रचार करण्याचा पडलेला प्रघात धोकादायक असताना सीएएची आलेली अधिसूचना अनेकांच्या पचनी पडेलच असे नाही . निवडणूक जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने आम्ही पूर्ण केल्याचे भाजपचे नेते सांगतात. निवडणूक तोंडावर असल्याने केंद्रातील भाजप आपल्या पोतडीतून कोणकोणती अस्त्रे अजून बाहेर काढणार याकडे अर्थातच सर्वांचे लक्ष असणार आहे. लाखो कोटींची उड्डाणे घेणे सध्या सुरू आहे.

# स्टेट बँक ते स्विस बँक!




निवडणूक रोखे हा ज्या सरकार आणि राजकीय पक्षांचा प्रश्न आहे, त्यांच्या अब्रूरक्षणार्थ स्वायत्त संस्थांनी स्वतःची पुण्याई पणास का लावावी ?इंग्रजीतील टू क्लेव्हर बाय हाफ या वाक्प्रचाराचा उपयोग वाक्यात कसा करावयाचा हे विद्यार्थ्यांस शिकवावयाचे असेल तर या भारतवर्षातील समस्त शालेय शिक्षकांनी स्टेट बँकेचे सोमवारी सर्वोच्च न्यायालयात जे काही झाले त्याचा दाखला अगत्याने द्यावा. मराठी माध्यमांतील शिक्षकांस त्यासाठी हात दाखवून अवलक्षण या वाक्प्रचाराचा पर्याय आहे. सर्वोच्च न्यायालयाने १५ फेब्रुवारीच्या महत्त्वपूर्ण निकालाद्वारे निवडणूक रोख्यांची अपारदर्शकता संपुष्टात आणली आणि या देणगीदारांचा सर्व तपशील सर्वांस खुला करण्याचा आदेश निवडणूक आयुक्त आणि स्टेट बँकेस दिला. विद्यमान सरकारने निवडणुकीतील पारदर्शकतेच्या नावाखाली ही रोखे पद्धत आणली तेव्हापासून ह्यलोकसत्ताह्नने यात पारदर्शकतेचा अभाव कसा आहे हे अनेकदा दाखवून दिले आहे. वानगीदाखल रोखे आणि धोके आणि आज रोख; उद्या या काही संपादकीयांचा दाखला देता येईल. सर्वोच्च न्यायालयाच्या १५ फेब्रुवारीच्या निकालात या साऱ्या आक्षेपांवर जणू शिक्कामोर्तब झाले आणि स्टेट बँकेस सर्व तपशील खुला करण्याचा आदेश दिला गेला. वास्तविक याआधी रिझर्व्ह बँकेनेही रोख्यांतील अपारदर्शकतेवर भूमिका घेतलेली होती. ती पुढे गुंडाळली गेली आणि सरकारसमोर या बँक नियामकाने लोटांगण घातले. रिझर्व्ह बँकेप्रमाणे निवडणूक आयुक्तही रोख्यांच्या विद्यमान व्यवस्थेविषयी समाधानी नव्हते. पण सरकारने डोळे वटारताच आयोगाची शस्त्रेही म्यान झाली आणि ही अपारदर्शी पद्धत अस्तित्वात आली. हा इतिहास लक्षात घेता सर्वोच्च न्यायालयाच्या अंतिम आदेशाचे स्वागत करून स्टेट बँकेने त्या आदेशाचे पालन करण्यात शहाणपण होते. पण नाही. सर्वोच्च न्यायालयाने रोख्यांचा तपशील जाहीर करण्याची मुदत संपण्याआधी दोन दिवस स्टेट बँकेस जाग आली आणि या बँकेने थेट ३० जूनपर्यंत तपशील जाहीर करण्यासाठीची मुदत वाढवून मागितली. ही उच्च दर्जाची लबाडी. याचे कारण निवडणुका तोंडावर आहेत आणि विद्यमान लोकसभेची मुदत जूनच्या दुसऱ्या आठवड्यात संपते. तोपर्यंत नवीन सरकार सत्तेवर येईल आणि अध्यादेश वा अन्य मार्ग हा तपशील जाहीर होण्यापासून रोखण्यासाठी उपलब्ध होतील. थोडक्यात निवडणुकांआधी हा तपशील जाहीर करणे स्टेट बँकेस टाळावयाचे होते. हे असे करण्यास स्टेट बँकेस सरकारने सांगितले की सत्ताधीशांनी वाक असे म्हटल्यावर रांगण्यास तयार असणाऱ्या बँक व्यवस्थापनानेच हे ठरवले याचे उत्तर कधीही मिळणार नाही. तथापि हा रोख्यांचा तपशील जाहीर झाला तर सत्ताधाऱ्यांस अडचणीचे ठरू शकते याचा विचार स्टेट बँकेने केला नसेलच असे नाही. तसेच ही मुदतवाढ मागणे आणि स्टेट बँकेचे अध्यक्ष दिनेश खारा यांस ऑगस्ट २०२४ पर्यंत दिलेली मुदतवाढ यांचा काही अर्थाअर्थी संबंध असेलच असेही नाही. तरीही स्टेट बँकेची ही कृती स्वायत्त म्हणवून घेणाऱ्या देशातील सर्वात मोठ्या बँकेची उरलीसुरली इभ्रत मातीत मिळवणारी होती, हे निश्चित. सर्वोच्च न्यायालयाचा ताजा निकाल ते उत्कृष्टपणे अधोरेखित करतो; ही अत्यंत समाधानाची बाब. स्टेट बँकेने आपल्या मागणीच्या पुष्ट्यर्थ हरीश साळवे या अत्यंत महागड्या कायदेपंडितांस उभे केले. पण त्याचा काही उपयोग झाला नाही. आता या साळवे यांस स्टेट बँकेने किती मोबदला दिला, या माहितीची मागणी कोणा माहिती हक्क कार्यकर्त्याने जरूर करावी. सर्वोच्च न्यायालयाचा गेल्या महिन्यातील निकाल इतका स्पष्ट होता की साळवे यांच्या बुद्धिचातुर्यावर स्टेट बँकेने इतका खर्च करण्याचे काही कारणच नव्हते. ही रोखे खरेदीदारांची माहिती दोन संचात आहे, ती ताडून पाहायला हवी, त्याला वेळ लागेल, उगाच चूक राहायला नको , वगैरे कारणे पुढे करताना साळवे यांस पाहणे केविलवाणे होते. त्याचे वर्णन युक्तिवाद या शब्दाने करणे म्हणजे श्यामभटाच्या तट्टाणीस अश्वमेध म्हणण्यासारखे. साळवे यांची मांडणी देशातील कोणत्याही विधि महाविद्यालयातील पहिल्या वर्षाच्या विद्यार्थ्याच्या बौद्धिक दर्जाची होती. ती करण्याआधी त्यांनी या निवडणूक रोखे व्यवहाराची सरकार-बँक निर्मित पुस्तिका जरी वाचली असती तरी जे काही मुद्दे त्यांनी मांडले ते मांडण्याचे धैर्य त्यांस होते ना. सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड, न्या. संजय खन्ना, न्या. बी. आर. गवई, न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या पीठाने सहजपणे स्टेट बँकेची लबाडी उघडी पाडली. मुख्य म्हणजे ह्यह्यगेल्या २६ दिवसांत तुम्ही केले काय? हा सरन्यायाधीश चंद्रचूड यांचा थेट प्रश्न बँक नेतृत्वाचे मिंधेपण चव्हाट्यावर टांगणारा होता. या प्रश्नाचे उत्तर साळवे यांस देता आले नाही आणि ज्या बाबी करायला सांगितलेल्याच नाहीत त्या करण्यासाठी मुदतवाढ मागण्याची गरजच नाही हे सत्य या संपूर्ण युक्तिवादात क्षणाक्षणाला समोर येत गेले. त्यात न्या. चंद्रचूड यांनी आपण यावरील निकाल खुल्या कोर्टात देत आहोत असे सांगून आणि तो लगेच देऊन स्टेट बँकेचे पुरतेच वस्त्रहरण केले. जे झाले त्यामुळे बँकेची इभ्रत मातीस मिळवली या मुद्द्यावर या खारा यांच्यावर खरे तर खरमरीत कारवाई व्हायला हवी. असो. या ताज्या निर्णयामुळे स्टेट बँकेस रोख्यांचा सारा तपशील मंगळवारी, १२ मार्च सायंकाळी पाचपर्यंत सादर करावा लागेल. मुदतवाढीची मागणी केली नसती तर आणखी एक दिवस मिळाला असता. मूळची मुदत १३ मार्चपर्यंत होती. ज्याच्याशी आपला संबंध नाही त्याच्या अब्रूरक्षणार्थ स्वायत्त संस्थांनी स्वतःची पुण्याई पणास लावायची नसते; याचे भान तरी स्टेट बँकेस या सर्वोच्च थप्पडीमुळे यायला हवे. रोखे देवाणघेवाण हा सरकार, देणगीदार आणि राजकीय पक्ष यांचा प्रश्न. स्टेट बँक ही केवळ त्याचे माध्यम होती. वर उल्लेखलेल्या दोघांत काय व्यवहार झाला यात स्टेट बँकेने पडायचे काहीही कारण नव्हते. हे म्हणजे प्रियकराने त्याच्या प्रेयसीस लिहिलेल्या पत्रातील मजकुराची जबाबदारी पोस्टमनने आपल्या डोक्यावर घेण्यासारखे. त्याचे ते काम नाही. स्टेट बँकेचेही ते काम नव्हते. रोखे कोणी घेतले आणि कोणास दिले याच्या नोंदी ठेवणे आणि न्यायपालिका वा चौकशी यंत्रणा जेव्हा मागतील तेव्हा सदर तपशील सादर करणे हे याबाबत स्टेट बँकेचे घटनादत्त कर्तव्य होते. ही साधी बाब स्टेट बँकेने नजरेआड केली आणि त्यामुळे हे असे तोंडावर पडण्याची वेळ आली.

एखादी खासगी बँक या जागी असती तर गुंतवणूकदारांनी बँक प्रमुखास घरी पाठवले असते आणि व्यवस्थापनास जाब विचारला असता. तसे काहीही आपल्याकडे होण्याची सुतराम शक्यता नाही. बँक वा अन्यांस स्वायत्तता द्यायला हवी असे म्हणणारे सत्ताधीश झाले की आधीच्या सत्ताधीशांइतकीच जमीनदारी वृत्ती प्रदर्शित करतात. म्हणूनच आजही आपल्या बँकांच्या मानेवरील सरकारी जोखड दूर होत नाही. तेव्हा स्टेट बँकेबाबत जे काही घडले त्याचे मूळ या मालकी हक्क मानसिकतेत आहे. तिचे काय करणार, हा प्रश्न. विशेषतः स्वित्झर्लंडमधील बँकांची गुप्तता संपुष्टात आणण्याचे आश्वासन देत सत्तेवर आलेल्यांनी उलट स्टेट बँकेच्या पारदर्शकतेसाठी हट्ट धरायला हवा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने स्टेट बँकेचा प्रवास स्विस बँकेच्या दिशेने सुरू होणे टळले, हे समाधान.

# कालबाह्य खाद्यपदार्थांची विक्री करणाऱ्या दोघांना अटक



**भिवंडी:** खाद्यपदार्थांची ऑनलाईन ऑर्डर स्वीकारून त्याची विक्री करणाऱ्या कंपनीने कालबाह्य झालेले खाद्यपदार्थ विल्हेवाट लावण्याकरता दिले असता त्या खाद्यपदार्थांची विक्री करून गिऱ्हाईकांची फसवणूक करणाऱ्या दोघांना शांतीनगर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. मोहमद अहमद मोहरम अली कुरेशी (४२) व असीम अक्रम अन्सारी (३१) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.खाद्यपदार्थांची ऑनलाईन ऑर्डर घेणाऱ्या झोमॅटो कंपनीने ११ मार्च रोजी त्यांच्या पाव, बटर,मिठाई असे विविध प्रकारच्या ५७ हजार ३०० रुपये किमतीचे कालबाह्य खाद्यपदार्थ विल्हेवाट लावण्यासाठी मोहमद व असीम या दोघांना विश्वासाने दिले होते.मात्र दोघांनीही आर्थिक फायद्यासाठी त्या खाद्यपदार्थांची विक्री करून गिऱ्हाईकांची फसवणूक केल्याचे आढळून आले आहे.त्यामुळे शांतीनगर पोलीस ठाण्याचे पोशि तौफिक शफीक शिकलगार यांच्या फिर्यादीवरून दोघांवर ४२० सह विविध कलमान्वये गुन्हा नोंदवून त्यांना अटक करण्यात आली आहे.

# उष्णतेचा पारा वाढला, नागरिकांना कडक तापमानाचे चटके

**ठाणे ।** ठाणे जिल्ह्यातील उष्णतेचा वाढता पारा पाहताच नागरिकांनी काळजी घेण्याचे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाच्या वतीने करण्यात आले. बुधवारी जिल्ह्यातील उष्णेतेचे तापमान ३७.४ अंश सेल्सिअस होते तर ठाणे शहरात 33.1 अंश सेल्सिअस उष्णतेचा पारा वाढला होता. यामुळे नागरिक सावध होऊन कडक उन्हापासून वाचण्याकरिता चेहरा झाकून तसेच फुल हाताचे कपडे घालून कार्यालयात ये-जा करताना दिसत होते. उन्हामुळे थंड पेयांना मागणी वाढली. पण अचानक उष्णतेचा पारा वाढत असल्याने थंड पेय देखील नागरिकांना हाणिकारक होत असल्यामुळे रेल्वे स्थानक, एसटी स्टॅन्ड परिसरात खुलेआम बफार्चो तसेच विविध पदार्थांची विक्री होणाऱ्या थंड पेयाकडे नागरिक वळताना दिसत होते. पण हे थंड पेय शरीराला किती घातक होत आहेत. याकडे अन्न सुरक्षा विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे देखील नागरिक सांगत आहेत. राज्यातील ठाणे जिल्ह्यात ३७. ४ तर अलिबाग येथे ३१. ६ अंश सेल्सिअस इतके जास्त उष्णेतेचे तापमान बुधवारी होते. यामुळे उर्वरित जिल्ह्यात देखील काही भागात उष्णतेचे प्रमाण वाढत असून उष्णतेची लाटच आली असल्याचे वर्तवले जात आहे. त्यादृष्टीने उपाययोजना करण्यासाठी ठाणे जिल्हा प्रशासन कार्यरत आहे. उष्माघाताचे सर्वेक्षण IHIP-NPCCHH पोर्टल द्वारे कामकाज करण्यात येत आहे. दैनंदिन माहिती IHIP- NPCCHH पोर्टलवर भरण्यासाठी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रावरील आरोग्य सहाय्यक व डेटा एन्ट्री ऑपरेटर यांना सुचना देण्यात आल्या आहेत. उष्णतेच्या वाढत्या त्रासामुळेग्रामस्थांनी काळजी घ्यावी.



शरीराचे तापमान वाढलेले, बेशुद्ध, घाम येणे, कुठे तरी थांबलेली अशी व्यक्ती आपल्या नजरेत आल्यास त्वरित १०२/१०८ या क्रमांकावर संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा आरोग्य विभागाने केले. यामुळे नागरिकांना उष्णतेपासून बचाव करण्याकरिता आरोग्य विभागाने देखील युद्ध पातळीवर तयारी केली आहे. उन्हामध्ये नागरिकांनी फिरताना छत्री घेऊनच फिरावे तसेच दुपारी कडक उन्हामधून फिरने टाळावे. आपल्या आरोग्याची काळजी घेणे आवश्यक आहे. कडक उन्हाचा त्रास जाणवला कि शासकीय दवाखाण्यात जाऊन उपचार करून घेणे आवश्यक आहे.

- डॉ. गंगाधर परगे, आरोग्य अधिकारी, ठाणे जिल्हा परिषद, ठाणे.

**उन्हापासून बचाव कशी काळजी घ्याल?**

- पुरेसे पाणी प्या, ताक, लिंबू पाणी, नारळ पाणी असे द्रव्य पदार्थ घ्या.
- शक्यतो तीव्र उन्हात दुपारी 12 ते 4 या वेळात घरात राहावे.
- सैलसर व सुती कपडे वापर करणे, शक्यतो पांढरे कपडे वापरावेत.
- डोक्यावर टोपी रुमाल किंवा छत्री वापरावी.
- थेट येणाऱ्या सूर्यप्रकाशाला उन्हाला अडवावे व वातावरण थंड राहिल यासाठी पंख्याचा वापर करण्यात यावा.
- गर्भवती स्त्रिया, वैद्यकीय समस्या असणाऱ्या कामगारांनी उन्हात काम करण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे.
- शेतकरी बांधवानी दुपारी शेतातील काम न करता, सकाळी लवकर शेत कामास सुरुवात करावी. उन्हात शारीरिक कष्टाची कठोर कामे टाळा.

**उष्णतेचा त्रास झालेल्या व्यक्तीना मदत कशी कराल -**

- संबंधित व्यक्तीला थंड ठिकाणी किंवा सावलीमध्ये तातडीने हलवावे.
- शरीराच्या जास्तीत जास्त भागावर किंवा कपड्यांवर थंड पाण्याचा मारा करावा.
- शक्य असेल तेवढा वेळ त्या व्यक्तीला वारा घालावा. लक्षणे आढळल्यास तातडीने वैद्यकीय सल्ला-
- प्रौढ व्यक्ती - शरीराचे तापमान 104 फेरहाईट पर्यंत किंवा 40 डिग्री सेल्सिअस पोचल्यास तीव्र डोकेदुखी, स्नायूचे आखडणे, मळमळणे, उलटीचा भास होणे, चिंता वाटणे, चक्कर येणे, हृदयाचे ठोके वाढणे, धडधडणे,
- लहान मुल - आहार घेण्यास नकार, चिडचिड होणे, लघवीचे कमी झालेले प्रमाण, शुष्क डोळे, कुठूनही रक्तस्त्राव होणे, तोंडाच्या जवळील त्वचा कोरडी होणे अशी लक्षणे दिसून आल्यास त्वरित डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

# Jewellery shop owner's wife strangled to death by house-help in upscale flat

**Mumbai :** A 63-year-old woman was allegedly strangled to death inside her upscale Nepean Sea Road apartment on Tuesday afternoon. The Malabar Hill police, who have registered a case of murder, suspect that their newly recruited house-help has committed the crime as he is missing since the time of the incident.Police said the deceased woman has been identified as Jyoti Shah, who stayed with her husband Mukesh on the 20th floor of Tahnee Heights in Malabar Hill.



Mukesh owns a jewellery showroom in south Mumbai. An officer said, "As usual, Mukesh left his apartment around noon for work. However, at around 3 pm, he tried calling his wife for some work and as she was not answering the calls, he sensed something amiss due to which he left everything and went back home." On reaching his apartment, he found his wife lying motionless in the bedroom. Since she was not responding, he rushed her to the hospital where she was declared dead before admission. Police said the woman was strangulated. The Malabar Hill police were subsequently informed after which a team was sent to the spot and a case of murder was registered late on Tuesday.

Festive offer

An officer said, "The family had hired a new house-help through their known person's reference and he had joined work on Tuesday. We suspect he has killed her because he is missing since the time of the incident." The investigators have also scrutinised the CCTV footage in which he could be seen walking out of the building premises. "We have learnt that he is from Darbhanga in Bihar and we are trying to trace him," said an officer. When asked whether the house-help had escaped with any valuables, the officer added, "Shah's body is still in the hospital for post-mortem. We are trying to understand whether she was killed using a cloth or a rope or by hands itself. The family is still grieving, but we strongly believe that the accused has stolen valuables from the house. However, we are yet to confirm or identify the valuables that have been stolen."

# Ellyse Perry's record 6/15 helps RCB reach playoffs

**Mumbai,** Bangalore, Bangalore, who had suffered an agonising one-run defeat against DC in their previous game, left nothing to chance this time and romped to victory. Four overs. Six wickets. One devastating spell. Ellyse Perry produced the best bowling figures in Women's Premier League history to help Royal Challengers Bangalore beat Mumbai Indians by seven wickets and reach the playoffs in Delhi on Tuesday. The star Australian all-rounder kept knocking the stumps over and in the process, ensured UP Warriorz and Gujarat Giants were knocked out of contention. Heading into the game, only defending champions MI and Delhi Capitals had secured their spot in the playoffs. A win



would've been enough to take RCB through, while UPW and GG needed Smriti Mandhana and Co to suffer a heavy defeat in order to have a chance. However, Bangalore, who had suffered an agonising one-run defeat against DC in their previous game, left nothing to chance this time and romped to victory. Opting to bowl first, they wrapped up the MI innings for 113 runs as Perry returned with sensational figures of 6/15. And in the reply, too, it was Perry's unbeaten 76-run stand with Richa Ghosh that took RCB to 115/5 in 15 overs. Mumbai were off to a promising start with the bat as openers Hayley Matthews and S Sajana added a 43-run partnership. But the innings unravelled soon after as Perry delivered a masterclass in seam bowling. The right-arm pacer had taken a superb catch in the deep to dismiss Matthews, before conceding just two runs in her first over. From there, her remaining three overs produced two wickets each as MI lost their last nine wickets for a mere 48 runs. Perry, who hadn't picked a single wicket in her four previous outings with the ball in the tournament, kept attacking the stumps and nipping the ball both ways.

## सायबर चोरट्याने वाशीतील बिल्डरला घातला ६० लाखांना गंडा



■ **नवी मुंबई :** अज्ञात सायबर चोरट्याने वाशीतील एका बिल्डरच्या कार्यालयातील अकाऊंटण्टचा मोबाईल नंबर मिळवून स्वतः बिल्डर असल्याचे भासवून अकाऊंटण्टला दोन बँक खात्यांमध्ये तब्बल ६० लाख ६० हजार रुपयांची रक्कम पाठवण्यास भाग पाडले. आपली फसवणूक झाल्याचे उघडकीस आल्यानंतर नवी मुंबई सायबर पोलिसांत बिल्डरने तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी अज्ञात सायबर चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करून त्याचा शोध सुरू केला आहे. या प्रकरणात फसवणूक झालेल्या बिल्डरचे कार्यालय वाशी सेक्टर-१९ मध्ये असून, गेल्या ६ मार्च रोजी सकाळी एका सायबर चोरट्याने या बिल्डरच्या कार्यालयातील फोनवर फोन केला होता. तसेच त्याने कागदपत्र घेण्याच्या बहाण्याने कंपनीतील कर्मचाऱ्यांकडून कंपनीतील अकाऊंटचे काम पाहणाऱ्या नितीन याचा मोबाईल नंबर मागून घेतला. या वेळी कंपनीतील कर्मचाऱ्यांनीदेखील ऑफिसचे काम असल्याचे समजून या सायबर चोरट्याला नितीनचा मोबाईल नंबर देऊन टाकला. सायबर चोरट्याने त्याच दिवशी दुपारी नितीनला व्हॉट्सॲप चॅटिंगद्वारे संपर्क साधला. तसेच तो कंपनीचा मालक असल्याचे व सदर मोबाईल नंबर हा त्याचा वैयक्तिक नंबर असल्याचे सांगून नितीनसोबत चॅटिंगला सुरुवात केली. या व्हॉट्सॲपच्या डीपीवर कंपनीच्या मालक बिल्डरचा फोटो असल्याने नितीननेदेखील सायबर चोरट्यासोबत कंपनीचा मालक असल्याचे समजून चॅटिंग सुरू केली. त्यानंतर सायबर चोरट्याने मटेरियल खरेदी करण्याच्या बहाण्याने आपल्या कंपनीच्या खात्यातून ४५ लाख ६० हजार रुपये एका बँक खात्यावर पाठवण्यास सांगून त्याला खाते क्रमांक दिला. या वेळी नितीनने देखील आरटीजीएसद्वारे सदरची रक्कम पाठवून दिली. काही वेळानंतर सायबर चोरट्याने व्हॉट्सॲपद्वारे पुन्हा नितीनला संपर्क साधून दुसरा खाते क्रमांक देऊन त्यावर १५ लाख रुपये पाठवण्यास सांगितले, ती रक्कमसुद्धा नितीनने कंपनीच्या खात्यातून पाठवून दिली. सायंकाळी कंपनी मालक बिल्डर आपल्या कार्यालयातून घरी जाण्यास निघाले असता, त्यांनी कंपनीतील कर्मचारी सतीश याच्याकडे दिवसभरात झालेल्या कामाचा तपशील घेतला. या वेळी सतीशने त्यांच्या सांगण्यानुसार, ६० लाख ६० हजार रुपयांचे दोन व्यवहार झाल्याचे सांगितले. आपण पैसे पाठवण्यास सांगितले नसताना, कंपनीच्या अकाऊंटण्टने दोन खात्यांवर पैसे पाठवल्याने बिल्डरने नितीनला बोलावून चौकशी केल्यानंतर त्याने व्हॉटसॲपवरील चॅटिंग दाखवून घडल्याप्रकाराची माहिती दिली.

## प्रेमसंबंध मान्य नसल्याने आईकडून मुलीची गळा दाबून हत्या



■ **मुंबई :** मुलीचे एका तरुणासोबत असलेले प्रेमसंबंध मान्य नसल्याने झालेल्या वादातून ४० वर्षीय आईने पोटच्या मुलीची गळा दाबून हत्या केल्याची खळबळजनक घटना वांद्रे येथे घडली. मुलीची आपल्या हातून हत्या झाल्याचे लक्षात येताच या निर्दयी मातेने मुलीचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचा बनाव केला. मात्र, वैद्यकीय तपासणी आणि पोलीस तपासात तिचा हा बनाव उघड झाला असून, निर्मलनगर पोलिसांनी आरोपी मातेला बेड्या ठोकल्या आहेत.

पोलिसांनी सरकारतर्फे फिर्याद नोंदवून दाखल केलेल्या गुन्ह्यानुसार, वांद्रे पूर्वेकडील खेरवाडी परिसरात रविवारी रात्री अडीजच्या सुमारास ही घटना घडली. मृत मुलगी भूमिका बागडे (१९) हिचे एका मुलासोबत प्रेमसंबंध होते. हे प्रेमसंबंध तिची आई टिना यांना मान्य नव्हते. यावरून दोघींमध्ये वाद सुरू होते. रविवारी रात्री अडीजच्या सुमारासदेखील या दोघींमध्ये यावरून कडाक्याचे भाडंण झाले. वाद एवढा विकोपाला गेला की, रागाच्या भरात भूमिकाने आई टिना हिच्या बोटाचा चावा घेऊन बोट तोडले, तर टिना यांनी भूमिकाचा गळा आवळला. यात भूमिकाचा मृत्यू झाला.

भूमिकाची आपल्या हातून हत्या झाल्याचे लक्षात येताच टिना यांनी मुलीचा नैसर्गिक मृत्यू झाल्याचा बनाव करत मुलीला रुग्णालयात दाखल केले. याची माहिती मिळताच निर्मलनगर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत भूमिकाचा मृतदेह ताब्यात घेऊन शवविच्छेदनासाठी पाठवून तपास सुरू केला.

भूमिकाला फिट येऊन ती जमिनीवर कोसळली. यात तिचा मृत्यू झाल्याचा बनाव टिना यांनी केला होता. मात्र, वैद्यकीय तपासणी आणि पोलीस तपासात तिचा हा बनाव उघड झाला. अखेर, पोलिसांनी आरोपी टिना यांच्या विरोधात हत्या करून पुरावे नष्ट केल्याप्रकरणी भादंवि कलम ३०२ आणि २०१ अन्वये गुन्हा दाखल करून तिला बेड्या ठोकल्या आहेत.

## चोरट्याने लुटले ४२ हजाराचे स्त्रीधन

■ **ठाणे:** लोणावळा येथे जाण्यासाठी लोकमान्य नगर डेपो परिसरात स्वामी मठाच्या ठिकाणी उभे असताना आलेल्या दुचाकीने स्पीड कमी करून पूजा सुधीर बाणावलीकर (५३) यांच्या गळ्यातील १४ ग्रमचे ४२ हजार रुपये किमतीचे स्त्रीधन खेचून दुचाकीवरून पोबारा केला. याबाबत दोन अज्ञात सोनसाखळी चोरांच्या विरोधात वर्तकनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.पूजा सुधीर बाणावलीकर आपल्या पतीसह एकवीरा देवी, कारला, लोणावळा येथे जाण्याकरता निघाले होते. त्या दरम्यान स्वामींच्या मठाचे बाजूने एक दूचाकी आली, त्या दुचाकीवर दोन इसम होते.पूजा यांच्या जवळ येताच त्यांनी दूचाकीचा वेग थोडा कमी केला.त्यापैकी मागे बसलेल्या गळ्यातील सोन्याचे मंगळसूत्र खेचून पोबारा केला.

## लिफ्टमध्ये अडकलेल्या तरुणाची सुटका

■ **ठाणे:** लिफ्टमध्ये अडकलेल्या तरुणाची सुखरूप सुटका करण्यात आली आहे. ठाणे स्टेशन रोडवरील ७ मजली ड्रीम आर्केड सोसायटी, ए-विंग या इमारतीच्या दुसऱ्या मजल्यावर लिफ्टमध्ये अथर्व रवींद्र गावडे(२१) हा तरुण अडकला होता. त्याची १० मिनिटांत अग्निशमन दलाच्या जवानांनी सुखरूप सुटका केली.तो त्या इमारतीच्या ४ थ्या मजल्यावर राहतो. या घटनेची माहिती मिळताच घटनास्थळी अग्निशमन दलाचे जवान तसेच आपत्ती व्यवस्थापन कक्षाचे कर्मचारी यांनी धाव घेत अडकलेल्या तरुणाची सुटका केली. तसेच या घटनेत कोणालाही दुखापत झाली नसल्याची माहिती आपत्ती व्यवस्थापन कक्षाने दिली.

## बेलापूरमध्ये बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेले ८ बांगलादेशी अटकेत

■ **नवी मुंबई :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कक्षाने बेलापूर येथील शहाबाज गावातील सागर रेसिडेन्सी इमारतीवर सोमवारी सकाळी छापा मारून या इमारतीत बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांना अटक केली आहे. यात ३ पुरुष व ६ महिलांचा समावेश असून हे सर्व बांगलादेशी नागरिक काही महिन्यांपासून मोलमजुरी व घरकाम करून या ठिकाणी वास्तव्यास असल्याचे तपासात आढळले आहे. बेलापूरमधील शहाबाज गावामध्ये काही बांगलादेशी नागरिक बेकायदेशीररीत्या वास्तव्यास असून ते एकत्र येणार असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. या माहितीच्या आधारे वरिष्ठ पोलीस निरीक्षक पृथ्वीराज घोरपडे व त्यांच्या पथकाने सोमवारी सकाळी १० वाजण्याच्या सुमारास बेलापूर येथील शहाबाज गावातील सागर रेसिन्डसी इमारतीतील रूम नंबर ४०३वर छापा मारला. यावेळी या ठिकाणी ३ पुरुष व ६ महिला आढळले. पोलिसांनी त्या सर्वांकडे भारतीय नागरिकत्वाबाबत पुरावे व कागदपत्रे सादर करण्यास सांगितले. त्यामधील नसरीन सिद्धिकी अख्तर (२५) या महिलेकडे पासपोर्ट व व्हिसा असल्याचे आढळून आले. मात्र पायल कुद्रुस मलिक, रुबी काशम अली बेगम, कनिका बाबू शेख, राणी शब्बीर मुल्ला, हलीमा सलीम शेख, मोनिरुल सिद्धिकी शेख, सलीम कुका शेख, मासुद राजू राना या ८ जणांकडे कोणत्याही प्रकारची वैध कागदपत्रे नसल्याचे आढळले. त्यामुळे अनैतिक मानवी प्रतिबंधक कक्षाने या ८ बांगलादेशी नागरिकांविरोधात एनआरआय पोलीस ठाण्यात भारतीय पासपोर्ट अधिनियम, तसेच विदेशी नागरिक अधिनियमानुसार गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास एनआरआय पोलीस करत आहेत.

## उद्घाटनाची घाई, बस मात्र डेपोतच राही!

### उल्हासनगर परिवहन सेवा पहिल्याच दिवशी ठप्प; चार्जिंगअभावी चक्काजाम

■ **उल्हासनगर :** उल्हासनगर महापालिकेच्या परिवहन विभागाच्या वतीने रविवारी कोणतीही पूर्व तयारी नसताना सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण आणि खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते मोठया धुमधडाक्यात परिवहन सेवेचा घाई घाईने लोकार्पण सोहळा करण्यात आला. मात्र सोमवारी पहिल्याच दिवशी चार्जिंग सेवा अभावी बस रस्त्यावर धावली नसल्याने प्रवाश्यांनी संताप व्यक्त केला. दुसरीकडे उल्हासनगर महापालिकेच्या या भोंगळ कारभारावर सर्वत्र टीका होत आहे. तर उदघाटन झाल्यावर पाहिल्याच दिवशी परिवहन सेवेला अपयश आल्याने याची चर्चा शहरात सुरु आहे. गेल्या अनेक महिन्यापासून उल्हासनगर महापालिका परिवहन ई-बस सेवा सुरू करण्यात येणार अशी चर्चा सुरु होती. शेवटी परिवहन बस सेवेचे रविवारी सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण व खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या हस्ते उदघाटन करण्यात आले. यावेळी आमदार डॉ. बालाजी किणीकर, आयुक्त अजीज शेख, अतिरिक्त आयुक्त जमीर लेंगरेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. परिवहन सेवेचे लोकार्पण झाल्यानंतर खासदार श्रीकांत शिंदे, आमदार बालाजी किणीकर, आयुक्त अजीज शेख यांच्यासह महापालिका अधिकाऱ्यांनी बसमधून फेरफटका मारला.

◆मात्र त्या ठिकाणी अद्यापही विजेचे ट्रान्सफार्मर बसवण्यात आले नाही. याशिवाय तिथे असलेल्या शौचालयात पाण्याची सुविधा नाही. बसच्या साफसफाई व दुरुस्तीसाठी रॅम बनविण्यात आला नसून बस धुण्याची कोणतीही सुविधा नाही. रिजेन्सी, उल्हासनगर रेल्वे स्टेशन पश्चिम आदी ठिकानी बस डेपोच्या कामाला अद्याप सुरवात झालेली नाही.

◆बस स्थानक तसेच बसचे मार्ग निश्चित करण्यात आलेले नाही. बस सेवा सुरु करण्यापूर्वी कोणतीही तयारी महापालिकेच्या वतीने करण्यात आली नसल्याने पालिकेचा भोंगळ कारभार उघड झाला आहे. महापालिकेच्या या कारभाराबाबत नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे.



◆मात्र सोमवारी महापालिका परिवहन बस रस्त्यावर उतरल्या नसल्याने प्रवाशांनी संताप व्यक्त केला आहे. महापालिकेच्या सर्व बसेस ई-बस असल्याने, बसेसला मोठया प्रमाणात चार्जिंगची गरज असते, मात्र त्या क्षमतेचे चार्जिंग सुविधा उल्हासनगर महापालिका चार्जिंग स्टेशनवर उपलब्ध नसल्याने बसची चार्जिंग झालीच नाही.

◆ त्यामुळे एक ही बस सोमवारी रस्त्यावर धावली नाही. पालिकेकडे असलेली चार्जिंग क्षमता पुरेशी नसल्याने, पुण्यावरून त्या अधिक क्षमतेची चार्जिंग मशीन मागवण्यात आली असल्याची माहिती उल्हासनगर महापालिकेचे मुख्यालय उपायुक्त अशोक नाईकवाडे यांनी दिली आहे. त्यांनी सांगितले की, शहाड डेपो येथे चार्जिंग स्टेशन बनविण्यात येणार आहे.

## वीजचोरी प्रकरणी दोघांवर गुन्हा दाखल

■ **भिवंडी :** भिवंडी शहर आणि ग्रामीण भागात वीज पुरवठा करणाऱ्या आणि बिले वसूल करणाऱ्या टोरंट पॉवर कंपनीकडून वीजचोरांवर कारवाई करण्यात येत आहे. असे असतानाही वीजचोरी आटोक्यात येत नाही.त्यानुषंगाने पुन्हा एकदा टोरंट पॉवर कंपनीच्या दक्षता विभागाच्या पथकाने तालुक्यातील सारंग गावातील घर क्रमांक १७२ वर छापा टाकून चिंतामण बिल्या पाटील व महेश पाटील यांना वीजचोरी करताना पकडले.याप्रकरणी त्यांनी शांतीनगर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.या दोघांनी स्वतःच्या आर्थिक फायद्यासाठी वीज मीटरमध्ये छेडछाड करून बेकायदेशीर कनेक्शन घेउन गेल्या वर्षभरात ६ हजार ५२२ युनिट वीज वापरून १ लाख ३८ हजार ७३० रुपयांची वीज चोरली.पोलिसांनी दोघांविरुद्ध वीज चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

## बिहारमधून चरस घेऊन आलेल्या तस्करला बेड्या

### गुन्हे शाखेची कारवाई, २ कोटी ११ लाख रुपयांचे चरस जप्त

■ **मुंबई :** बिहारमधून चरस घेऊन आलेल्या एका तस्करला गुन्हे शाखेच्या कक्ष ४ ने बेड्या ठोकल्या आहेत. आदिज अहमद सिद्धीकी (२६) असे अटक आरोपीचे नाव असून गुन्हे शाखेने त्याच्याजवळून दोन कोटी ११ लाख रुपयांचे चरस जप्त केले आहे. बोरिवली पूर्व रेल्वे स्थानक परिसरात एक तस्कर मोठ्या प्रमाणात ड्रग्ज घेऊन येणार असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या कक्ष ४ ला मिळाली होती. त्यानुसार, कक्ष ४ चे प्रभारी पोलीस निरीक्षक इंद्रजीत मोरे यांच्या नेतृत्वातील पथकाने मंगळवारी पहाटे साडेचारच्या सुमारास सापळा रचून सिद्धीकी याला ताब्यात घेतले. झडतीमध्ये त्याच्या जवळ १४ पॅकेटमध्ये गुंडाळलेले एकूण ७ किलो ४० ग्रॅम चरस सापडले. याची आंतरराष्ट्रीय बाजारातील किंमत २ कोटी ११ लाख रुपये आहे. या प्रकरणी कस्तुरबा मार्ग पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करून सिद्धीकी याला अटक करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले.



## शेलार ग्रामपंचायतीचे कर्मचारी थकीत वेतनसाठी बेमुदत संपावर

■ **भिवंडी :** भिवंडी तालुक्यातील मोठी ग्रामपंचायत म्हणून ओळखल्या जार्णाया शेलार ग्रामपंचायतीचे सर्व कर्मचारी तब्बल आठ महिन्याच्या थकीत वेतनसाठी मंगळवारी ग्रामपंचायत कार्यालयाला कुलूप लावून कार्यालयासमोर बेमुदत संपासाठी बसले आहेत. शेलार येथील ग्रामपंचायत कर्मचारी यांनी आपल्या 8 महिन्याच्या थकीत वेतानासाठी ग्रामपंचायत कार्यालय शेलार येथे बेमुदत संप सुरू केला असून ग्रामपंचायत कर्मचारी यांनी या संपाद्वारे प्रशासनाकडे आपल्या थकीत वेतनाची,भविष्य निर्वाह निधीची आणि जीवन विमा हप्ते भरण्याची मागणी केली आहे. संप सुरूच राहिल्यास 40 हजार लोकसंख्या असलेल्या शेलार गावात नागरिकांचे पिण्याच्या पाण्यासाठी हाल होण्याची शक्यता आहे. शेलार ग्रामपंचायत ही विसर्जित झाली असून येथील प्रशासकाची नेमणूक प्रकरण हे उच्च न्यायालयात प्रलंबित असल्याने कर्मचार्यांचे वेतन न झाल्याने गटविकास अधिकारी यांना वेतन देण्याचा आदेश न झाल्याने कर्मचार्यांचे वेतन होऊ शकले नाही आहेत यामुळे कर्मचार्यांवर उपासमारीची वेळ आली आहे. संपाबाबत ग्रामपंचायत कर्मचारी यांनी जिल्हा परिषद मुख्यकार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हाधिकारी, तहसीलदार, गटविकास अधिकारी पंचायत समिती भिवंडी, ग्रामविकास अधिकारी शेलार याना दिनांक 6 मार्च रोजी पत्र माहिती दिली होती. तरीही काहीच कार्यवाही न झाल्याने मंगळवारी अखेर ग्रामपंचायत कर्मचारी यांनी कार्यालयाला कुलूप ठोकून संप सुरू केला आहे. संपाला महाराष्ट्र राज्य ग्रामपंचायत कर्मचारी युनियनचे ठाणे जिल्हा अध्यक्ष अजय जाधव, तालुका अध्यक्ष श्याम भोईर माजी सरपंच घनश्याम भोईर सिद्धार्थ भोईर, प्रहार संघटना चेतन जाधव,जिजाऊ संघटना कृष्णा अधिकारी आणि ग्रामपंचायत चे माजी सद्स्य यांनी भेट देऊन पाठिंबा दिला आणि सदर विषय आमदार महेश चौगुले यांना सांगून मार्ग काढण्याची विनंती केली तरीही काहीही निर्णय न झाल्याने पाणीपुरवठा आणि सफाई बंद ठेवण्याचा निर्णय घेऊन आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्णय कर्मचार्यांनी घेतला आहे.

## पालिकेत नोकरीचे आमिष दाखवून लाखोंची फसवणूक




■ **मुंबई :** मुंबई महानगरपालिकेत नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून ताडदेवमधील तरुणाला १० लाख ३० हजार रुपयांना गंडा घालण्यात आला आहे. फसवणूक झालेल्या तरुणाने दिलेल्या तक्रारीवरून, या प्रकरणी संतोष केळसकर आणि निनाद केळसकर यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून गावदेवी पोलीस अधिक तपास करत आहेत. येथील नाना चौक परिसरात राहणाऱ्या कमलेश वाबळे (३०) याने पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, यातील आरोपी संतोष आणि निनाद यांनी जुलै २०२२ ते मार्च २०२४ दरम्यान त्याची फसवणूक केली आहे. कमलेश हा नोकरीच्या शोधात असताना जोगेश्वरीतील रहिवासी निनादशी त्याची ओळख झाली. त्याने त्याचा मित्र मुंबई महानगरपालिका, बॉम्बे पोर्ट ट्रस्ट तसेच एमएमआरडीए येथे नोकरी मिळवून देत असल्याचे सांगून आपल्या जाळ्यात ओढले. निनादने कमलेश याची अंधेरीतील रहिवासी संतोषसोबत भेट घालून दिली. संतोषने त्याला मुंबई महानगरपालिकेतील अधिकाऱ्यांसोबत ओळख असून, तेथे नोकरी मिळवून देतो, असे सांगत त्याच्याकडून एकूण १० लाख ३० हजार रुपये उकळले. त्यानंतर ना नोकरी मिळाली. ना भरलेले पैसे परत मिळाले. आपली फसवणूक झाल्याची खात्री पटल्याने कमलेशने गावदेवी पोलीस ठाणे गाठून तक्रार दिली आहे.

## डॉक्टरचे अपहरण: टोळी जेरबंद

■ **माळेगाव (पुणे) :** प्रेमाच्या जाळ्यात ओढण्याचा बहाणा करून डॉक्टरचे खंडणीसाठी अपहरण करणारी टोळी बारामती तालुका ग्रामीण पोलिसांनी जेरबंद केली. आरोपींना २५ मार्चपर्यंत न्यायालयाने कोठडी दिल्याची माहिती तपास अधिकारी सहायक पोलीस निरीक्षक राहुल घुगे यांनी दिली. या प्रकरणी ज्योती कदम, चेतन गायकवाड अशी गुन्हा दाखल झालेल्या आरोपींची नावे असून, खंडणीच्या रकमेचा धनादेश घेणाऱ्या झुंझार मागाडे यास पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. फिर्यादी डॉक्टर हे पोलीस स्टेशनला आल्यानंतर त्यांनी हा घडला प्रकार पोलिसांना सांगितला. खंडणी घेताना पोलीस पथकाने आरोपीला ताब्यात घेतले.

## ट्रकची दुचाकीला धडक, एकाचा मृत्यू

■ **ठाणे:** ठाण्याकडून घोडबंदरकडे जाणाऱ्या ट्रक चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने दुचाकीला धडक बसली.या अपघातात एकाचा मृत्यू झाला असून एक गंभीररीत्या जखमी झाला आहे. हा अपघात झाल्यावर ट्रक चालक घटनास्थळावरून पळून गेला आहे.घोडबंदर रोड वरील आनंद नगर येथील आनंद नगर सिग्नल जवळ ठाण्याकडून घोडबंदरकडे जाणाऱ्या वाहिनीवर ट्रक चालकाचा वाहनावरील ताबा सुटल्याने पुढे चालणाऱ्या दुचाकीला धडक बसली. ही दुचाकी सोनल कांबळे यांच्या मालकीची असून प्रमोद सेजवड हे नाशिक ते घोडबंदर रोड या मार्गावर चालवत होते. या दुचाकी ट्रकने धडक दिल्यामुळे दुचाकी चालक गंभीररीत्या जखमी झाला आहे . तर दुचाकीवरती पाठीमागे बसलेल्या नाशिक येथे राहणाऱ्या यश गायकवाड ( १६ ) याचा जागीच मृत्यू झाला.या अपघाताची माहिती ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन कक्षाला देण्यात आली.

## बोगस धनादेशांद्वारे पर्यटन संचालनालयाची ६८ .६७ लाखांची फसवणूक

■ **मुंबई :** बोगस धनादेश तयार करून त्यावर बोगस शिक्के, स्वाक्षऱ्यांचा वापर करून ते खरे असल्याचे भासवत वेगवेगळ्या बँकांतून १५ धनादेशांद्वारे पर्यटन संचालनालयाची ६८ लाख ६७ हजार रुपयांची फसवणूक करण्यात आल्याचा खळबळजनक प्रकार समोर आला. पर्यटन संचालनालयातील मुख्य लेखा अधिकारी विठ्ठल सुडे यांच्या फिर्यादीवरून आरोपी आकाश डे, तपन मंडल, लक्ष्मी पाल आणि आनंदा मंडल यांच्या विरोधात गुन्हा दाखल करून मरिन ड्राईव्ह पोलीस अधिक तपास करत आहेत. मुख्य लेखा अधिकारी सुडे यांनी पोलिसांत दिलेल्या तक्रारीनुसार, यातील आरोपी आकाश, तपन, लक्ष्मी आणि आनंदा यांनी १३ ते १६ फेब्रुवारीदरम्यान पर्यटन संचालनालयाच्या बँक ऑफ महाराष्ट्र बँकेच्या नरिमन पॉईंट येथील मंत्रालयीन शाखेतील चालू खात्यातून बोगस धनादेश तयार केले. त्यावर बोगस शिक्के व बोगस स्वाक्षऱ्यांचा वापर करून ते खरे आहेत, असे भासवत वेगवेगळ्या बँकांतून १५ धनादेशांद्वारे एकूण ६८ लाख ६७ हजारांची फसवणूक केली. हा प्रकार समोर आल्यानंतर सुडे यांनी मरिन ड्राईव्ह पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

आरोपी आकाश डे याने एकूण २२ लाख ७९ हजार रुपये काढले असून, तपन मंडल याने २२ लाख ७३ हजार रुपये वठवले आहेत. तर, लक्ष्मी पाल याने १३ लाख रुपये आणि आनंदा मंडल याने ९ लाख २४ हजार रुपये त्यांच्या खात्यावर परस्पर वळते करून पर्यटन संचालनालयाच्या कार्यालयाची फसवणूक केल्याचा आरोप ठेवण्यात आला आहे.

## गांजा घेऊन जाणारी रिक्षा लागली पोलिसांच्या हाती

■ **नवी मुंबई :** रबाळे वाहतूक पोलिसांच्या सतर्कतेमुळे गांजा घेऊन जाणारी रिक्षा सोमवारी रात्री ऐरोली येथे पोलिसांच्या हाती लागली. वाहतूक पोलिसांनी या कारवाईत सुमारे पावणेतीन लाख रुपये किमतीचा गांजा व रिक्षा जप्त करून रबाळे पोलिसांच्या ताब्यात दिला आहे. रिक्षाचालकाचा साथीदार पळून जाण्यात यशस्वी झाला असून, रबाळे पोलीस त्याचा शोध घेत आहेत. यशवंत तिकुटे (३३) असे या प्रकरणी अटक केलेल्या रिक्षा चालकाचे नाव असून, तो बेलापूर सेक्टर-८, संभाजीनगर येथे राहण्यास आहे. सोमवारी रात्री यशवंत त्याचा साथीदार संतोष काळे याच्यासोबत मुलुंड येथून रिक्षामधून गांजा घेऊन बेलापूरच्या दिशने जात होता. रात्री सव्वाआठ वाजण्याच्या सुमारास ऐरोलीतील खेडेकर चौकातून त्यांची रिक्षा जात असताना त्याठिकाणी वाहतूक नियमांसाठी उभे असलेले रबाळे वाहतूक शाखेतील पोलीस हवालदार सचिन त्रंबके व पोलीस शिपाई गणेश गायकर या दोघांना या रिक्षाचा संशय आला. त्यामुळे त्यांनी या रिक्षाला थांबवण्याचा इशारा केल्यानंतर रिक्षामध्ये पाठीमागे बसलेला संतोष काळे हा रिक्षातून उडी टाकून पळून गेला. या वेळी रिक्षाचालक यशवंत तिकुटे हादेखील पळून जाण्याच्या प्रयत्नात असताना पोलिसांनी त्याला पकडले. त्यानंतर रबाळे वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय बेंडे यांच्या समक्ष रिक्षाच्या सीटवर पाठीमागील बाजूस असलेल्या प्लास्टिकच्या गोणीची तपासणी केली असता, त्यात काड्या, पाने, फुले, बिया असलेला उग्र वासाचा गांजा हा अमली पदार्थ आढळून आला.

## बंद होणाऱ्या शाळेचे पुनर्वसन होणार

### आ .रईस शेख यांच्या हस्ते शाळा बांधकामाचे भूमिपूजन



■ **भिवंडी :** शहरातील कल्याणरोड आजबीबी येथील मनपा शिक्षण मंडळाच्या शाळा क्र. ६५ ची इमारत जुनी व मोडकळीस आली असताना ती वेळीच दुरुस्त न करता पालिकेने त्याकडे दुर्लक्ष केले होते. या परिसरातील विद्यार्थ्यांच्या सोयीच्या दृष्टीने या इमारतीचे बांधकाम करण्यासाठी भिवंडी पश्चिमचे आमदार रईस शेख यांनी पुढाकार घेतल्याने परिसरातील पालकांनी त्याचे स्वागत केले आहे. या इमारतीचे भूमिपूजन नुकतेच आ.रईस शेख यांच्या हस्ते झाले आहे.

भिवंडी मनपा शिक्षण मंडळाची शाळा क्र. ६५ हि उर्दू भाषिक शाळा ६१ वर्षे जुनी असून या शाळेत शिक्षण घेऊन अनेक विद्यार्थी उच्च पदास पोहोचले आहेत. तर काही व्यावसायिक बनले आहेत. मात्र गेल्या काही वर्षांपासून या शाळेचे वर्ग मोडकळीस आले असून त्याबाबत अनेकवेळा शाळेचे मुख्याध्यापक यांनी शिक्षण मंडळ प्रशासन अधिकारी व मनपा प्रशासनास लेखी कळविले होते.

परंतु पालिका प्रशासनाने निधी उपलब्ध नसल्याचा बहाणा करून त्याकडे दुर्लक्ष केले. ही बाब आमदार रईस शेख यांच्या निदर्शनास आल्यानंतर त्यांनी शाळेची इमारत नव्याने बांधण्यासाठी ६० लाख रुपये आमदार निधी मंजूर करून नियोजित इमारतीचे भूमिपूजन केले.त्याचबरोबर या नवीन इमारतीमध्ये वाचनालय बनवून शाळेत अत्याधुनिक सुविधा देण्याचा प्रयत्न करणार आहे. ज्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाची गोडी वाढून विद्यार्थ्यांची पटसंख्या वाढीस लागेल,अशी माहिती आ.रईस शेख यांनी दिली.